Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १९१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २९ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पीएम मोदींना शिवीगाळ! अमित शाह म्हणाले तुम्ही जितक्या शिव्या द्याल, तितके कमळ फुलेल...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ गुवाहाटी**

या वर्षाच्या अखेरीस बिहारमध्ये विधानसभा निवडणुका आहेत. या पार्श्वभूमीवर भाजप आणि काँग्रेसमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फेऱ्या सुरू झाल्या आहेत. दरम्यान, राहुल गांधी मतदार हक्क यात्रेनिमित्त बिहारचा दौरा करत आहेत. यादरम्यारम्यान, काँग्रेसच्या मंचावरुन युथ काँग्रेसच्या स्थानिक नेत्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आईवरुन शिवीगाळ केल्याची घटना घडली. यावरुन आता केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली आहे.

आसामची राजधानी गुवाहाटी येथे एका सभेला संबोधित करताना अमित



शाह म्हणाले की, २७ देशांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित केले आहे. असा पंतप्रधान ज्यांचा संपूर्ण जग आदर करतो, परंतु काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारतीय राजकारणात द्वेष आणि तिरस्काराचे नकारात्मक राजकारण सुरू केले आहे. सध्या बिहारमध्ये घुसखोर बचाओ यात्रा सुरू आहे. या यात्रेतून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दिवंगत आईसाठी अपशब्द वापरण्यात आले. हे काँग्रेस नेत्यांनी केलेले सर्वात घृणास्पद कृत्य आहे.

शाह पुढे म्हणाले की, राहुल गांधींनी या मंचावरुन द्वेषाचे राजकारण सुरू केले आहे. पंतप्रधान मोदींच्या दिवंगत आईबद्दल वापरल्या जाणाऱ्या अपशब्दांचा मी मनापासून निषेध करतो आणि मी संपूर्ण देशातील जनतेला सांगू इच्छितो की, राहुल गांधी यांनी सुरू केलेल्या निरर्थक, नकारात्मक आणि द्वेषपूर्ण राजकारणामुळे आपले सार्वजनिक जीवन उंचावणार नाही तर ते खोलवर जाईल.

द्वेषाचे हे राजकारण आजचे नाही. मोदीजी सत्तेत आल्यापासून सोनिया गांधी, राहुल गांधी, दिग्विजय सिंह, मणिशंकर अय्यर, जयराम रमेश, रेणुका चौधरी, प्रत्येक काँग्रेस नेत्याने मोदीजींसाठी अपशब्द वापरले आहेत. काही त्यांना मृत्युचा व्यापारी म्हणतात, काही त्यांना विषारी साप म्हणतात, काही त्यांना नीच म्हणतात, काही त्यांना रावण म्हणतात, काही त्यांना भस्मासुर म्हणतात, काही त्यांना विषाणू म्हणतात. काँग्रेस नेत्यांना काय वाटते? अशा प्रकारची भाषा वापरून तुम्हाला जनादेश मिळेल? आज मी काँग्रेस नेत्यांना सांगू इच्छितो की, भाजपला जितक्या जास्त शिव्या द्याल, तितके मोठे कमळ फुलून आकाशात पोहोचेल, असेही शाहांनी यावेळी म्हणाले.

## अमरावती ते मुंबई एअर अलायन्सची विमानसेवा ठप्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ अमरावती**

केंद्र सरकारच्या योजनेंतर्गत सुरू झालेली अमरावती ते मुंबई एअर अलायन्सची विमानसेवा तूर्तास बंद झाली आहे. विमानात तांत्रिक बिघाड आल्यामुळे अमरावतीसह हैदराबादचीही विमानसेवा बंद करण्यात आल्याची माहिती आहे. १ किंवा १५ सप्टेंबर २०२५ पासून एअर अलायन्स सेवा सुरू होईल, अशी सूत्रांची माहिती आहे.

अमरावती विमानतळाहून १६ एप्रिल २०२५ रोजी एअर अलायन्सचे मुंबईकडे पहिले प्रवासी विमान झेपावले होते. सोमवार, बुधवार आणि शुक्रवार असे आठवड्यातून तीन दिवस मुंबई-अमरावती- मुंबई ही विमानसेवा सुरू आहे. मध्यंतरी वातावरण खराब झाल्यामुळे अमरावती ते मुंबईदरम्यान काही विमानफेऱ्या रद्द कराव्या लागल्या. मात्र, २१ ऑगस्टपासून अमरावती-मुंबई एअर




अलायन्सची विमानसेवा बंद झाली आहे.

एअर अलायन्सच्या विमानात तांत्रिक बिघाडाची युद्धस्तरावर दुरुस्ती सुरू आहे. एअर अलायन्सचे हैदराबाद ते मुंबई ही विमानसेवा तूर्तास रद्द करण्यात आली आहे. मात्र, २१ ऑगस्टपासून विमानप्रवास करणाऱ्यांचे नियोजन कोलमडले आहे. 'ऑपरेशन इश्श्यू'च्या नावाखाली विमानसेवा थांबली असली तरी एअर अलायन्सच्या विमानात मोठा बिघाड झाल्याची माहिती आहे. मुंबई ते अमरावती, मुंबई ते हैदराबाद या विमानफेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. या संदर्भात अमरावतीच्या विमानतळ अधिकाऱ्यांशी विचारणा केली असता 'नो कॉमेंट्स' असे उत्तर मिळाले, हे विशेष.

**मुंबईकडे ५० ते ६० प्रवाशांचे बुकिंग**

एअर अलायन्स विमानाने अमरावती ते मुंबईकडे ये-जा करणाऱ्यांची संख्या ५० ते ६० एवढी असते. साधारणतः विमान बुकिंगची अशीच आकडेवारी आहे. त्यामुळे मुंबई-अमरावती विमानसेवा सुरळीत सुरू असल्याचे चित्र आहे.

## परदेशी स्वस्त कापसामुळे शेतकऱ्यांच्या कापसाचे भाव पडणार; केंद्राच्या धोरणावर शेतकरी नाराज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ नागपूर :**

केंद्र सरकारने १८ ऑगस्ट रोजी कापसावरील ११ टक्के आयात शुल्क ३० सप्टेंबरपर्यंत शून्य करण्याचा निर्णय घेतला होता. अवघ्या १० दिवसांत या निर्णयाला ३१ डिसेंबरपर्यतची मुदतवाढ दिली आहे. कापड मिल मालकांचा दबाव व अमेरिकेच्या टॅरिफच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या या निर्णयामुळे देशांतर्गत बाजारातील कापसाचे दर प्रचंड दबावात आले असून, कापसाची



आयात १ ऑक्टोबरनंतर किमान २० लाख गाठींनी वाढणार आहे.

भारताच्या तुलनेत जागतिक बाजारात कापसाचे दर कमी आहेत. त्यामुळे कापड मिल मालक दोन वर्षांपासून कापसावरील आयात शुल्क हटविण्याची मागणी करीत आहेत. त्यातच भारतीय शेतीक्षेत्र आयातीसाठी खुले करण्याच्या दृष्टीने अमेरिकेने भारतावर आधी २५ टक्के टॅरिफ लावला आणि नंतर त्यावर २५ टक्के पेनल्टी लावून हा टॅरिफ ५० टक्के केला. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने कापड मिल मालकांची मागणी पुढे करीत १८ ऑगस्टला कापसावरील आयात ३० सप्टेंबरपर्यंत शुल्क शून्य केला. या निर्णयाचा अमेरिकेतर काहीच परिणाम न झाल्याने सरकारने कुणाचाही मागणी नसताना याला २८ ऑगस्ट रोजी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली.

## मराठा आंदोलनामुळे मुंबईत कुठे कुठे ट्रॅफिक जॅम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ मुंबई**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन सुरू केलं असून त्यासाठी लाखो मराठा बांधव दाखल झाले आहेत. त्यामुळे मुंबईमध्ये अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाल्याचं दिसून येतंय. अनेक रस्त्यांवर गाड्याच गाड्या दिसत असून ईस्टर्न फ्री वेवर वाहतूक कोंडी झाली आहे. तर मध्य रेल्वेची वाहतूकही काही प्रमाणात संथ झाल्याचं दिसून येतंय.

एकीकडे गणपतीचा उत्साह असताना दुसरीकडे मराठा




आरक्षणाचं आंदोलन सुरू झालं आहे. त्यासाठी राज्यभरातून लाखो बांधव मुंबईत पोहोचले आहेत. अनेक ठिकाणी रस्ते वाहतूक कोंडी झाल्याने आंदोलकांनी लोकल ट्रेनचा पर्याय घेतल्याचं दिसून येतंय. त्यामुळे सीएसटीएम आणि चर्चगेट मध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी झाली आहे.

सीएसटी वरुन कल्याण आणि पनवेलकडे जाणाऱ्या लोकल रेल्वे तुडुंब भरलेल्या दिसत आहेत. तसेच मध्य रेल्वेची वाहतूक १० मिनिटे उशीरा होत आहे.

**ईस्टर्न फ्री वेवर वाहतूक कोंडी**

या मराठा आंदोलकांमुळे ईस्टर्न फ्री वेवर वाहतूक कोंडी झाली आहे. मराठा आंदोलकांच्या शेकडो गाड्या ईस्टर्न फ्री वेवर असल्यानं मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली असून वाहतूक पोलीस ही कोंडी सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत. मानखुर्द येथे मोठ्या प्रमाणात सायन -पनवेल हायवेला वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. पाऊस आणि आंदोलकांमुळे ट्रॅफिक जॅम झाल्याचं दिसून येतंय.

## आंदोलनावर पोळी भाजणाऱ्यांचं तोंड भाजेल', मुख्यमंत्री फडणवीस यांचा विरोधकांना इशारा; मराठा आंदोलनावर मोठं विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ मुंबई**

मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश व्हावा, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हजारो आंदोलकांसह मुंबईच्या आझाद मैदान परिसरात आंदोलनासाठी बसले आहेत. मुंबईत आंदोलकांनी गर्दी केल्यामुळे गंभीर प्रश्न उपस्थित झाल्याचा आरोप विरोधक करत आहेत. तसेच आंदोलकांना सोयी-सुविधा पुरविल्या गेलेल्या नाहीत, असाही आरोप विरोधकांनी केला. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

आंदोलनावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मनोज जरांगे पाटील उपोषणासाठी बसले आहेत.



आज सकाळी आंदोलक मुंबईत आले. मुंबईत काही ठिकाणी रास्ता रोको करण्याचे प्रकार घडले. मात्र पोलिसांनी समजूत घातल्यानंतर आंदोलक बाजूला झाले. जरांगे पाटील यांनीही शांततेत आंदोलन करण्याचे आवाहन केले आहे. शासनाचीही सहकार्याची भूमिका आहे. लोकशाही पद्धतीने आंदोलन होत असेल तर त्याला कुठलीच मनाई नाही.

**आंदलोनाला गालबोट लागू नये**

उच्च न्यायालयाने जे निर्देश दिले आहेत, त्यानुसार सरकार सर्व काही मदत देईल. इतक्या मोठ्या प्रमाणात लोक आल्यानंतर काही प्रमाणात अडथळा निर्माण होतो, तसा फटका वाहतुकीला बसताना दिसत आहे. काही अतिउत्साही लोकांमुळे संपूर्ण आंदोलनाला गालबोट लागते. पण अशाप्रकारे कुणी वागू नये, याकडे लक्ष द्यावे लागेल. मनोज जरांगे पाटील यांनीही अलोकतांत्रिक आणि आडमुठे पद्धतीने वागू नये, असे आवाहन केलेले आहे, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला एक दिवसाची परवानगी देण्यात आली होती. त्यामुळे किती दिवस आंदोलन चालणार? असा प्रश्न विचारला असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आंदोलनाला एक दिवसाची परवानगी मिळाली होती. मात्र त्यांनी पुन्हा परवानगी मागितली आहे. कायद्याच्या चौकटीत राहून उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पोलीस पालन करतील. आंदोलनकर्ते आणि प्रशासन यांच्यातील हा प्रश्न आहे.

## मुंबईत पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचलं
### नांदेड- परभणीसह मराठवाड्यात अतिवृष्टीने जनजीवन विस्कळीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ मुंबई**

मुंबईसह राज्यभर पावसाने दमदार हजेरी लावली असून त्यामुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाल्याचं दिसून आलं. मुंबईत पडलेल्या पावसामुळे अनेक ठिकाण पाणी साचलं. मुंबईसह नवी मुंबईमध्ये अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीही झाल्याचं दिसून आलं. त्याचसोबत मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने शेतीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे.

मुंबई उपनगरात पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचल्याचं दिसून आलं. अंधेरी पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा सबवे काही वेळेसाठी पाण्याखाली गेला. अंधेरी सबवेवर चार ते पाच फुटांपर्यंत पाणी साचल्यानं हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता.

परभणीत गुरुवार रात्रीपासून संततधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे पालम तालुक्यात शेतीचं नुकसान झालं. शेकडो हेक्टर शेतजमीन पाण्याखाली गेली आहे. तसंच पालम तालुक्यातील आरखेड, सोमेश्वर, फळा, उमरथडी,घोडा, पुयनी, आडगाव, वणभुजवाडी, तेलाजपूर या नऊ गावांचा संपर्क तुटला. पालम शहराच्या जवळून जाणाऱ्या ओढ्यालाही पूर आला. त्यामुळे आजूबाजूची संपूर्ण शेती पाण्याखाली गेली. सततच्या या नुकसानीमुळे शेतकरी पुन्हा एकदा संकटात सापडला आहे.

यवतमाळच्या उमरखेड आणि महागाव तालुक्यात शुक्रवार सकाळपासून विजेच्या कडकडाटासह धुवाधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नद्या नाल्यांना पूर आला.

VIDARBHA YOUTH WELFARE SOCIETY'S
PROF RAM MEGHE COLLEGE OF ENGINEERING AND MANAGEMENT
ESTD. 2009
NEW EXPRESS HIGHWAY, BADNERA - AMRAVATI
ACCREDITED WITH GRADE A+ NAAC CYCLE II
DTE CODE 1128 www.prmceam.ac.in

BE, MBA FIRST YEAR
ADMISSION (2025-26)

| CHOICE CODE | BRANCH | INTAKE |
|---|---|---|
| 0112819110 | Civil Engineering | 60 |
| 0112824210 | Computer Science and Engineering | 120 |
| 0112824610 | Information Technology | 120 |
| 0112891210 | Computer Science and Engineering (Data Science) | 60 |
| 0112829310 | Electrical Engineering | 60 |
| 0112837210 | Electronics and Telecommunication Engineering | 60 |
| 0112810110 | Master of Business Administration MBA | 60 |

BE ME MBA Ph.D
HELPLINE
9860454899, 8087275248
7875355888, 9975539499

## संपादकीय ......

# देश झुकणार नाही

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या घोषणेनुसार भारतावर अतिरिक्त २५ टक्के आयात शुल्क लागू झाल्याने भारतावर लावलेले एकूण शुल्क ५० टक्के झाले. या शुल्कवाढीने भारताच्या अमेरिकेतील निर्यातीला ४८ अब्ज डॉलर्सचा फटका बसेल, असा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वदेशीचा नारा देत पैसा कोणाचाही असो, उत्पादन भारतात व्हावे आणि त्याला आपल्या मातीचा सुगंध असावा, असे सांगत अमेरिकेला जोरदार प्रत्युत्तर दिले. रशियाकडून तेल खरेदी न थांबवल्यामुळे भारतातून अमेरिकेत निर्यात वस्तूंवर हा अतिरिक्त कर लावला गेला. खरे तर, अशाप्रकारचे अतिरेकी पाऊल ट्रम्प उचलणार नाहीत, अशी अपेक्षा होती; पण अमेरिकेने आता तशी औपचारिक अधिसूचनाही जाहीर केली.

देशांतर्गत गरजा भागविण्यासाठी भारताला रोज ५० लाख बॅरल्सपेक्षा जास्त तेल लागते. त्यापैकी ८५ टक्के तेल आयात केले जाते. भारत रशियाकडून एकूण गरजेच्या १/३ कच्चे तेल आयात करतो. जानेवारी ते जून या काळात भारताने रशियाकडून रोज सुमारे १७ लाख बॅरल्स तेल खरेदी केले. गेल्या वर्षी हे प्रमाण १९ लाख बॅरल्स होते; मात्र चार वर्षांपूर्वी भारत रशियाकडून रोज केवळ १ लाख बॅरल्स तेल आयात करत होता. पूर्वी भारत इराक, सौदी अरेबिया या पारंपरिक पुरवठादारांवर अवलंबून होता; मात्र रशिया-युक्रेन संघर्षानंतर अमेरिकेने रशियावर निर्बंध घातले. त्यामुळे रशियाने अमेरिका आणि युरोपला पर्याय म्हणून भारत व चीनला सवलतीत इंधन पुरवठा करण्यास सुरुवात केली. त्याचा भारताला फायदा झाला.

देशाची ऊर्जा सुरक्षा आणि राष्ट्रीय हित डोळ्यासमोर ठेवून सर्वात स्पर्धात्मक स्रोतांकडून तेल खरेदी सुरूच ठेवली जाईल, असे रशियातील भारतीय राजदूत विनयकुमार यांनी नुकतेच म्हटले आहे. त्यांचे हे वक्तव्य इंधन खरेदीबाबत देशाचे धोरण स्पष्ट करणारे आहे. रशियन कच्च्या तेलाच्या आयातीवरून अमेरिकेचा दबाव वाढत असताना भूमिकेवर ठाम राहत राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्धार भारताने पुन्हा व्यक्त केला. कोणत्याही आर्थिक दबावाला समर्थपणे तोंड देत पुन्हा उभे राहण्याचा निर्धार त्यामागे आहे. 'कितीही दबाव आणला, तरी त्याला तोंड देण्यास सक्षम आहोत. संकटकाळातही ताकद वाढवत राहू', असे उद्गार दंडात्मक शुल्क लागू होण्याच्या दोन दिवस आधीच पंतप्रधान मोदी यांनी काढले होते. छोटे उद्योजक, शेतकरी व पशुपालकांचे नुकसान होऊ देणार नाही.

आजच्या या जगात आर्थिक स्वार्थाचे राजकारण केले जाते. सर्वजण हितसंबंध जपत आहेत आणि आम्हीही ते जपत आहोत, असे त्यांनी ठणकावले होते. तुम्हाला भारताकडून तेल किंवा दुग्धोत्पादने खरेदी करण्यास अडचण असेल, तर खरेदी करू नका. तुम्हाला कोणीही जबरदस्ती करत नाही, असे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनीही अमेरिकेला ऐकवले. खुद्द अमेरिका आणि युरोपमधील अनेक देश रशियासोबत व्यापार करत आहेत. अशावेळी भारताने स्वहित का जपू नये? भारत खरेदी करत असलेल्या तेलामुळे रशियास प्रचंड महसूल मिळतो आणि त्याचा वापर रशिया-युक्रेनमधील लष्करी कारवाईसाठी करत असल्याचा आरोप अमेरिकेने केला आहे. कोणत्याही देशाच्या महसुलात त्याच्या निर्यात व्यापाराचा वाटा असतोच.

अमेरिकेने यापूर्वी अफगाणिस्तान व इराकवर हल्ले केले. त्याचा खर्च अमेरिकेने कोणत्या देशातून आलेल्या महसुलातून केला, हे अद्याप कोणी विचारले आहे का? ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष पुतीन यांची १५ ऑगस्ट रोजी अलास्कामध्ये भेट झाली. यावेळी रशिया-युक्रेन संघर्षावर तोडगा निघण्याची अपेक्षा होती; पण काहीच निर्णय झाला नाही. २०२० च्या निवडणुकीनंतर ट्रम्प व्हाईट हाऊसमध्ये असते, तर युक्रेनमधील युद्ध सुरूच झाले नसते, अशा शब्दात पुतीन यांनी ट्रम्प यांना जरा चढवले! पण, ट्रम्प यांची कोणतीही मागणी त्यांनी मान्य केली नाही. त्यामुळे रशियाला घेरण्यासाठी अमेरिकेने भारतावर करांची कुर्हाड चालवली. अर्थात, औषधे, सेमीकंडक्टर्स आणि ऊर्जा संशोधनासारख्या काही क्षेत्रांमधून येणार्या मालास सूट दिली; पण या नव्या शुल्कामुळे कपडे, रत्ने, दागिने, चामडे, सागरी उत्पादने, रसायने, वाहनांचे सुटे भाग यासारख्या क्षेत्रांना झळ पोहोचू शकते.

भारत-अमेरिका द्विपक्षीय व्यापार करारावर अद्याप सहमती झालेली नाही. अतिरिक्त शुल्कामुळे त्याबाबत आता फार अपेक्षाही ठेवता येणार नाही. कृषी आणि दुग्धजन्य उत्पादन क्षेत्राची बाजारपेठ उघडा आणि त्यावरील कर कमी करा, यासाठी अमेरिका भारतावर दबाव आणत आहे; पण मोदी यांनी त्यास ठामपणे नकार दिला. आता या नव्या आव्हानास तोंड देण्यासाठी भारत युरोप, आग्नेय आशिया व आफ्रिकेतील देशांमध्ये निर्यात वाढवून व्यापार संतुलन ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे अमेरिकेवरील अवलंबित्व कमी होईल. चीन-भारताचे संबंध सुधारत असून, चीनमध्येही भारतास अधिकाधिक निर्यात करता येईल. शिवाय तेल खरेदीच्या बदल्यात रशिया भारताला बाजारपेठ खुली करून देण्याची खात्री देत आहे, ही नक्कीच आशादायक बाब आहे. भारत-रशियातील व्यापार वाढवण्यास खूप संधी आहे. दुसरीकडे भारत देशांतर्गत तेल खोदाई व उत्पादनावरही भर देत आहे. शिवाय अमेरिकेने आक्रमक पवित्रा मागे न घेतल्यास तेथून येणार्या मालावर भारतालाही ज्यादा कर लावता येतील. २०१९ मध्ये भारताने अमेरिकेकडून येणार्या बदाम, फळे व पोलादावर जादा शुल्क लावले होते. अमेरिकेच्या आयात निर्बंधांचा ज्या उद्योग क्षेत्रांना तडाखा बसेल, त्या -त्या क्षेत्रांना खर्च कमी करण्यासाठी भारत सरकार अनुदान देण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे जागतिक स्पर्धेस तोंड देता येऊ शकेल. अमेरिकेसमोर मान तुकवण्याइतका भारत दुबळा राहिलेला नाही. जगातील तिसर्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेचे स्थान मिळवण्याच्या दिशेने झपाट्याने आगेकूच करत आहे, हे लक्षात घ्यावे लागेल.

# बालसंगोपन संस्थांतील मुलांच्या मानसिक आरोग्यासाठी मासूम

## मुख्यमंत्र्यांच्या संवेदनशील निर्णयामुळे ३,३३७ मुलांना लाभ

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ मुंबई,** राज्यातील बालसंगोपन संस्थांमध्ये राहणाऱ्या समस्याग्रस्त आणि विधी संघर्षीत मुलांना मानसिक आरोग्यसेवा व समुपदेशन करण्यासाठी महिला व बालविकास विभाग एमपॉवर संस्थेच्या माध्यमातून मासूम प्रकल्प राबवित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील निर्णयामुळे या प्रकल्पाचा आजपर्यंत ३,३३७ मुलांना लाभ झाला असून एकूण ९५९३ वैयक्तिक समुपदेशन सत्रे पार पडली आहेत.महाराष्ट्रातील महिला व बालविकास विभाग राज्यातील बालकल्याण व मानसिक आरोग्याच्या कार्याला बळकटी देण्यासाठी, आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या चेंर्शी या उपक्रमामार्फत 'मासूम' प्रकल्प राबवीत आहे. या प्रकल्पांतर्गत अडचणीत असलेल्या व विधी संघर्षीत मुलांना, जे बाल संगोपन संस्थांमध्ये राहतात, त्यांना मानसिक आरोग्य सेवा व समुपदेशन पुरवले जाते. हा सार्वजनिक-खाजगी भागीदारीचा उपक्रम, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आला आहे.

सेवेची भावना या उद्देशाने व बांधिलकीने चेंर्शी व आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापिका व अध्यक्षा, श्रीमती नीरजा बिर्ला यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या प्रयत्नातून १८० दशलक्षाहून अधिक लोकांपर्यंत पोहोचून, चेंर्शी हे दक्षिण आशियातील मानसिक आरोग्य साक्षरता, क्षमता-वृद्धी आणि सामुदायिक संपर्कावर लक्ष केंद्रित करणारे सर्वांत मोठे खासगी व्यासपीठ ठरले आहे.



महिला व बालविकास विभाग (थउऊ) सोबतच्या सामंजस्य करारानंतर हा प्रकल्प मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर आणि नाशिक या विभागांमध्ये राबवला जात आहे. एकूण १९ बालसंगोपन संस्थांना पाच मानसशास्त्रज्ञाच्या टीमकडून सेवा दिल्या जात आहेत. या प्रकल्पांतर्गत मानसशास्त्रज्ञ रोटेशन पद्धतीने सीसीआयला भेट देतात, स्तिथीपरत्वे समुपदेशन करतात, मुलांचे मानसिक आरोग्य स्क्रिनिंग करतात आणि गरजेनुसार थेरपी सेवा पुरवतात. याशिवाय गंभीर प्रकरणांमध्ये बालकल्याण समिती (उथउ) आणि किशोर न्याय मंडळाला (गगइ) तज्ज्ञांचे सहकार्य दिले जाते. थेरपिस्ट काही मुलांच्या आरोग्य आणि मानसिक परिस्थितीनुसार त्यांचे तणाव मापन पट्टी आक्रमकता मापन पट्टी स्थिती-गुणधर्म चिंतामापन चाचणी मानसिक आरोग्य व कल्याण मापन पट्टी यांसारख्या साधनांद्वारे सखोल परीक्षण केले जाते.मुलांच्या कुटुंबियांनाही समुपदेशनाची सुविधा दिली जाते. पालकांचे समुपदेशन केल्याने , मुले घरी परतल्यावर त्यांना पुर्वीप्रमाणे मोकळे वातावरण मिळेल हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. मासूम प्रकल्प हा राज्यातील बालसंगोपन संस्थांमध्ये मानसिक आरोग्य सेवांना बळकटी देणारा ठरला असून मुलांच्या पुनर्वसन प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

या प्रकल्पासंदर्भात चेंर्शी व आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापिका व अध्यक्षा नीरजा बिर्ला म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील संस्थांमध्ये राहणाऱ्या मुलांच्या मानसिक आरोग्याला दिलेले प्राधान्य हे दूरदर्शी नेतृत्वाचे द्योतक आहे. या सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे चेंर्शी चे कार्य म्हणजे अडचणीत असलेल्या व विधी संघर्षीत मुलांना त्वरित ट्रॉमा रिलिफ व सर्वसमावेशक मानसशास्त्रीय आधार देणे. प्रशिक्षित मानसशास्त्रज्ञांच्या मदतीने विद्यमान प्रणालीला बळकटी देऊन मुलांच्या पुनर्वसन व समाजात पुन्हा समावेशक होण्यासाठी सुरक्षित व सहाय्यकारी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

# जेवणानंतर लगेच काहीतरी गोड खावंसं वाटतं, साखर किंवा गूळ खाता?

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक –** जेवणानंतर बऱ्याच जणांना गोड खाण्याची प्रचंड इच्छा का होते, याविषयीची तज्ज्ञ सांगतात कि तुम्हाला जेवणानंतर शुगर क्रेव्हिंग होत असेल तर तुमच्या आहारात प्रोटीन्सची खूप कमतरता आहे. तुम्ही भलेही अगदी पोटभर जेवत असाल, तुमच्या जेवणात अनेक पौष्टिक






गोष्टी असतील.. पण तरीही तुमच्या जेवणात पुरेसं प्रोटीन नसेल तर मात्र तुम्हाला नक्कीच शुगर क्रेव्हिंग होऊ शकतं.

त्यामुळे शुगर क्रेव्हिंग टाळण्यासाठी सुरुवातीला काही दिवस जेवणातले प्रोटीन्स वाढवून पाहा. कडधान्ये, डाळी, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ तुमच्या आहारात वाढवा. काही दिवस प्रोटीनयुक्त पदार्थ जास्त प्रमाणात खाल्ल्यानेही शुगर क्रेव्हिंग कमी होऊ शकते.

काही जण असेही असतात ज्यांना जेवणानंतर गोड खाण्याची सवय मागच्या कित्येक वर्षांपासून असते. त्यामुळे सवयीचा भाग म्हणूनही जेवणानंतर अनेकांना गोड खावंसं वाटतं. एक्सपर्ट असंही सांगतात की जेवणानंतर गोड खावं वाटत असेल तर अवश्य खा. पण थोडी पथ्ये मात्र नक्की पाळा. जेवणानंतर अगदी थोडंसं गोड खा. गोडामधले काही पौष्टिक पदार्थ खा. वजन, शुगर वाढणार नाही.

# तुरीच्या खोडावर चट्टे पडतायत असू शकतोय 'हा' रोग; कसे कराल नियंत्रण? वाचा सविस्तर

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक**

फायटोप्थोरा ब्लाइट हा रोग फायटोप्थोरा प्रजातीच्या बुरशीमुळे होतो. पिकाच्या रोप अवस्थेत हा रोग झाल्यास पाने व देठ करपतात.

ज्या ठिकाणी २० अंश से. तापमान, चढ उताराची जमीन आणि अधिक पर्जन्यमान होते त्या ठिकाणी हा रोग प्रमुख्याने रोपावस्थेत येत असल्याने तूर पिकाचे मोठे नुकसान होते.

मागील हंगामात प्रामुख्याने मराठवाड्यामध्ये या रोगाचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात दिसून आला आहे. महाराष्ट्रात/मराठवाड्यात हा रोग पिकाच्या शाखीय वाढीच्या अवस्थेत उशिराने येताना दिसतो.

**लक्षणे–** फायटोप्थोरा ब्लाईटमुळे प्रथमतः खोडावर लंबगोलाकार परंतु टोकाकडे निमुळते होत गेलेले राखेरी चट्टे पडतात.

कालांतराने तिथे खाच दिसायला लागते तसेच तेथील खोडाचा भाग फुगतो व गाठी पडतात त्या ठिकाणी धागेरी आकारदेखील तयार होतो.

फांद्यावर व खोडावर अधिक प्रादुर्भाव झाल्यास डिंकासारखा चिकट पदार्थाचा स्राव ओघळू लागतो.

खोड तपकिरी पडून करपते तसेच फांद्या देखील करपू लागतात.

पावसाच्या काळात याचे प्रमाण वाढते.

**कसे कराल रोग व्यवस्थापन?**

तूरपीक लागवडीसाठी समपातळीतील पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी.

जमिनीमध्ये पाण्याचा निचरा होत नसेल तसेच चोपण किंवा चढ उतार उताराच्या जमिनीत पिकाची लागवड झाली असेल या ठिकाणी जमिनीतून उदभवणारे रोग जसे की फायटोप्थोरा, मर आणि मूळकुज इत्यादी बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात दिसून येतो.

शेतामध्ये वनस्पतीचे कुजके अवशेष, काश्या, धसकटे व काडी कचरा असू नयेत. शेत आणि बांध स्वच्छ ठेवावेत जेणेकरून रोगाचा प्रादुर्भाव व प्रसार होणार नाही.

उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरट करावी जेणे करून सूर्यकिरणांमुळे बुरशीचे बीजाणू नष्ट पावतील.




शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
शाडू मातीच्या आकर्षक गणेश मूर्ति विक्रीसाठी उपलब्ध
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

तीन वर्षांपेक्षा अधिक काळ एकाच जमिनीत तूर पीक घेऊ नये.

शेताच्या चारही बाजूस चर काढावा जेणे करून शेतात पाणी साचून फायटोप्थोरा बुरशीची वाढ होणार नाही.

पिकांची फेरपालट व आंतरपिकाचा शेतीत समावेश असावा जेणेकरून बुरशीच्या वाढीस आळा बसेल.

बीजप्रक्रियेमध्ये जैविक बुरशीनाशकांचा वापर जसे की, ट्रायकोडर्मा किंवा बायोमिक्स १० ग्रॅम प्रती किलो बियाणास वापरावे, अथवा बीज प्रक्रियेमध्ये १.५ ग्रॅम आंतरप्रवाही (उदा: कार्बेन्डाझिम) आणि २.५ ग्रॅम स्पर्शजन्य (उदा: थायरम) प्रती किलो बियाण्यास चोळावे. अथवा कार्बोक्झीन ३७.५% + थायरम ३७.५% या बुरशीनाशकाची ४.० ग्रॅम प्रती किलो याप्रमाणे बीज प्रक्रिया करावी.

रोगाची लक्षणे दिसताच जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा किंवा बायोमिक्सची २०० ग्रॅम/मिली प्रती १० लीटर पाणी याप्रमाणे रोगग्रस्त भागामध्ये आवळणी करावी.

रासायनिक बुरशीनाशकांमध्ये मेटाल्कझिल घटक फायटोप्थोरा बुरशीसाठी नियंत्रण म्हणून प्रभावी असल्याचे प्रयोगांच्या निष्कर्षावरून दिसून आले आहे.

**– वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी**

कृषि संशोधन केंद्र, बदनापूर

# आज, उद्या जोरदार पावसाची शक्यता: बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे होणार पाऊस; सतर्कतेचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९**अमरावती – बंगालच्या उपसागरावर तसेच छत्तीसगड भागात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. सोबतच बाष्पयुक्त वारे वाहत असल्यामुळे अमरावती जिल्ह्यात २९ व ३० ऑगस्टला सर्वदूर पावसाची दाट शक्यता आहे. याचदरम्यान जिल्ह्यातील काही ठिकाणी अतिजोरदार पाऊस होण्याची शक्यता असून जिल्ह्यात या दोन्ही दिवशी 'ऑरेंज अलर्ट' दिला आहे, अशी माहिती प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूरच्या तज्ज्ञांनी दिली आहे.

ऑगस्ट महिन्यात जिल्ह्यात समाधानकारक पाऊस झाला आहे. या पावसामुळेच अनेक जलाशय तुडुंब भरले असून, जिल्ह्यातील सर्वात मोठ्या नल दमयंती धरणाचे तीन दरवाजे गुरुवारी (दि. २८) उघडून पाण्याचा विसर्ग करण्यात आला. यासोबतच इतर जलसाठ्यांतूनही पाणी सोडण्यात आले. समाधानकारक पावसामुळे पिकांची स्थिती चांगली आहे.

मात्र ऑगस्टमध्येच काही ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे तसेच घरांचेही नुकसान झाले. दरम्यान मागील पाच ते सहा दिवसांपासून पावसाचे प्रमाण कमी झाले. मात्र पुन्हा एकदा २९ व ३० ऑगस्टला जिल्ह्यात सर्वदूर पावसाची शक्यता आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीची नोंद होऊ शकते. पावसासोबतच वादळ आणि विजांचा कडकडाटही होणार आहे.

# सहा लाख हेक्टरवरील पिकं अतिवृष्टीमुळे पाण्यात; ऑगस्टच्या पावसाने शेतकरी उद्ध्वस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती–** यंदाच्या सततच्या पावसामुळे व अतिवृष्टीमुळे पश्चिम विदर्भातील तब्बल ६.०८ लाख हेक्टरमधील तूर, कपाशी, सोयाबीन, संत्रा व भाजीपाला पिके बाधित झाल्याचा अहवाल कृषी सहसंचालक कार्यालयाने दिला आहे. एकट्या ऑगस्ट महिन्यातच ४.५८ लाख हेक्टरमध्ये नुकसान झालेले आहे. त्यातच पुढील चार दिवस हवामान विभागाने 'येलो अलर्ट' जाहीर केल्याने शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली आहे.

जून महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे १,०८,९१३ शेतकऱ्यांच्या ९८,२०९ हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले. यासाठी एनडीआरएफच्या निकषाने ८८.२३ कोटींच्या निधीची मागणी शासनाकडे करण्यात आलेली आहे. यामध्ये सर्वाधिक ८७,३९० हेक्टरमध्ये नुकसान बुलढाणा जिल्ह्यात झालेले आहे. जुलै महिन्यात २०४ शेतकऱ्यांच्या ५२,९२९ हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले. यामध्ये सर्वाधिक ३१,५४२ हेक्टरमध्ये नुकसानदेखील बुलढाणा जिल्ह्यातील आहे.



पश्चिम विदर्भात यवतमाळ व वाशिम जिल्हा वगळता अमरावती अकोला व बुलढाणा जिल्ह्यात पावसाने अद्याप सरासरी गाठलेली नाही. तरीही ऑगस्ट महिन्यात पावसाची सरासरी १५ टक्के तूट भरून निघाली. 'महावेध'च्या अहवालानुसार, विभागात आतापर्यंत ५८१.५ मिमी पावसाची सरासरी अपेक्षित असताना ५७८.५ मिमी पाऊस झालेला आहे.

### आठ दिवसांत ४.५८ लाख हेक्टर बाधित

ऑगस्ट महिन्यात १३ ते २० तारखेदरम्यान संततधार पाऊस, अतिवृष्टीने विभागात ४४ तालुक्यांतील ३१५२ गावे बाधित झाली. या गावांमध्ये ४,५७,५८८ हेक्टरमधील पिकांचे ३३ टक्क्यांवर नुकसान झाले आहे. यामध्ये यवतमाळ जिल्ह्यात सर्वाधिक १,१८,३५९ हेक्टर, वाशिम ९८,३५३ हेक्टर, अकोला २६,९४१ हेक्टर, बुलढाणा ८९,७२८ हेक्टर व अमरावती जिल्ह्यात ५४,२०६ हेक्टरमध्ये नुकसान झाले आहे. या बाधित गावांमध्ये पंचनामे करण्याचे काम सुरू आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २९ ऑगस्ट २०२५ शहर/ग्रामिण

# 'ऑपरेशन सिंदूर', शेतकरी आत्महत्यांवरून सरकारवर प्रहार

## नागपुरातील पुरीच्या गणपतींचे वादग्रस्त देखावे चर्चेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९नागपूर–**

सरकारवर टीका करणाऱ्या देखाव्यांसाठी प्रसिद्ध असलेला नागपूरच्या पुरीचा गणपती यंदाही 'ऑपरेशन सिंदूर', 'शेतकरी आत्महत्या'च्या मुद्यावर केंद्र व राज्य सरकारवर प्रहार करणाऱ्या देखाव्यामुळे चर्चेत आला आहे. त्यामुळे पोलिसांकडून हे देखावे जप्त केले जातात का ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नागपुरातील पाचपावलीमधील चंद्रशेखर आझाद गणेशोत्सव मंडळातर्फे हे देखावे तयार करण्यात आले आहेत. या मंडळाचे हे ६७ वे वर्ष आहे. पूर्वी हा गणपती गुलाबपुरींचा गणपती म्हणून ओळखला जातो व तो सरकार विरोधी वादग्रस्त देखाव्यांसाठी प्रसिद्ध आहे. अनेकदा त्याचे देखावे पोलीस जप्त करतात.




आता हीच परंपरा गुलाब पुरी यांचे पुत्र चंद्रशेखर पुरी पुढे नेत आहेत. गणेश चतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी पुरीच्या गणेशाची प्रतिष्ठापना होते. त्यामुळे दरवर्षी त्यांच्या देखाव्याबाबत उत्सूकता असते. यंदा गुरवारी संध्याकाळी पाचपावलीतील नंदगिरी मार्गावर मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी करण्यात आलेल्या देखाव्यातून ऑपरेशन सिंदूर, शेतकरी आत्महत्या या मुद्यांवरील देखाव्यातून केंद्र आणि राज्य सरकारला लक्ष्य करण्यात आले आहे. भारत –पाक युद्ध आपण थांबवल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला होता. याविषयावर 'भारत के प्रमुख–मूक दर्शन' असा देखावा तयार करण्यात आला आहे. व्यात 'केंद्र सरकारचे प्रमुख म्हणून एक पुतळा तयार करण्यात आला असून त्याच्या मागे डोनाल्ड ट्रम्प यांचे छायाचित्र असलेल्या फलकावर 'ऑपरेशन सिंदूर तो रुकाया,अब देश चलायेगे क्या ट्रम्प? असे लिहिले आहे. गणपतीची मूर्ती शेतकऱ्याच्या वेशातील असून त्याच्या पायाशी फलक लावण्यात आला आहे. त्यावर 'आई–वडिलाला फासावर लटकवणारे सरकार' असे लिहिले आहे. मूर्तीच्या मागे एक मोठा कापडी फलक लावला असून त्यावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे छायाचित्र आहे व फलकावर 'विदर्भ कल्याण का ढोंग बंद करो' असे लिहिले आहे. गणपतीची प्रतिष्ठापना झाल्यानंतर थोड्याच वेळात तेथील देखाव्यांची चर्चा शहरभर सुरू झाली.

# आधी पर्यायी व्यवस्था करा, नंतरच अतिक्रमण मोहीम राबवा

### विविध पक्ष व नागरिकांच्या वतीने एसडीओ व मुख्याधिकार्यांना निवेदन

### चांदूर रेल्वेतील अतिक्रमण मोहीम स्थगित न झाल्यास तिव्र आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९चांदूर रेल्वे–** आधी पर्यायी व्यवस्था करा, नंतरच चांदूर रेल्वे शहरात अतिक्रमण मोहीम राबवा अशी मागणी करीत आम आदमी पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, शिवसेना (ठाकरे गट) यांच्यासह फुटपाथ व्यवसायी, हॉकर्स, नागरिकांच्या वतीने एसडीओ व मुख्याधिकार्य़ांना माजी न.प. उपाध्यक्ष नितीन गवळी यांच्या नेतृत्वात गुरूवारी (ता. २८) निवेदन दिले. सदर अतिक्रमण मोहीम तत्काळ स्थगित न झाल्यास तिव्र आंदोलनाचा इशाराही प्रशासनाला दिला आहे.

चांदूर रेल्वे शहरात अनेक गोरगरिब नागरिक रस्त्याच्या कडेला टिनशेडचे ठेले, हातगाडी किंवा खाली जमीनीवर छोटा मोठा व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. मात्र येत्या काही दिवसांत नगरपालिकेकडून चांदूर रेल्वे शहरातील अतिक्रमण हटविण्याची मोहीम हाती घेण्यात येणार असल्याची मुनादी फिरविण्यात आली असुन ३१ ऑगस्टपर्यंतची डेडलाईन देण्यात आली आहे. परंतु अतिक्रमण कुठल्या भागातील हटविणार आहात व ऐन सणासुदीच्या दिवसांत अतिक्रमण हटविण्याचा उद्देश काय ?, संपुर्ण शहराचे अतिक्रमण हटविण्याबाबत कुठल्या वरिष्ठांचे



पत्र आहे का ? अशा प्रश्नांचा भडीमार करीत नागरिक एसडीओ कार्यालय व नगर परिषद कार्यालयात पोहचले होते. शहरातील संपुर्ण अतिक्रमण हटविल्यास सणासुदीच्या दिवसांत गोरगरिब लोकांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न उद्भवू शकतो. सदरचे अतिक्रमण धारक नगरपरिषदकडून दररोज वसुल केला जाणारा कर सुध्दा भरतात. त्यामुळे अतिक्रमण हटवितांना त्याआधी त्यांना योग्य पर्यायी जागा उपलब्ध करून देणे ही स्थानिक स्वराज्य संस्थेची कायदेशीर जबाबदारी आहे. व उपजीविकेच्या हक्काचे संरक्षण करूनच कोणतीही कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. शहरात हॉकर्स झोन तयार करून अतिक्रमीत नागरिकांना पर्यायी जागा द्यावी व तोपर्यंत नियोजित सदरच्या अतिक्रमण कारवाईला स्थगिती द्यावी. अतिक्रमणची कारवाई झाल्यास संबंधित प्रशासनाविरूध्द तिव्र आंदोलनाचा इशाराही निवेदनातून दिला आहे. निवेदन देतेवेळी आप नेते तथा माजी न.प. उपाध्यक्ष नितीन गवळी, भाकप नेते विनोद जोशी, भाकप तालुका सचिव सतिश चौधरी, माजी न.प. सभापती मेहमुद हुसैन, शिवसेना (ठाकरे गट) नेते बंडूभाऊ यादव, गजानन यादव, माकप नेते रामदास कारमोरे, भिमराव खलाटे, महादेव शेंद्रे, गजानन पेठे, विविध कार्यकारी सोसायटी अध्यक्ष हर्षल वाघ, कमलकिशोर पनपालीया, विश्वजीत घोडेस्वार, नागरिक सुमेध सरदार, प्रदीप मेश्राम, लवकुश खुणे, राजीव शिवणकर, रोशन हटवार यांसह अनेक व्यावसायीक, नागरिक उपस्थित होते.

# कांदिवलीत रवी राणा–अडसूळ भेट; बाप्पाच्या दर्शनासोबत विविध विषयांवर चर्चा







आनंदराव अडसूळ शिवसेनेचे ज्येष्ठ नेते शिवसेनेचे संपर्कप्रमुख माजी आमदार अभिजीत अडसूळ त्यांच्या राहते घरी कल्पतरू गार्डन कांदिवली येथे आमदार रवी राणा यांनी गणपती बाप्पाचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला व यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली.

# रविराज देशमुख यांची शेकडो भाजप कार्यकर्त्यांसह ट्रॅक्टर शोरूमवर धडक

## आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला ट्रॅक्टर केला परत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

नेरपिंगळाई येथील शेतकरी प्रकाश पोटे यांनी २० जानेवारी २०२५ रोजी यांनी सततच्या नापिकीमुळे आत्महत्या केली. प्रकाश पोटे यांच्या परिवारामध्ये त्यांच्या पत्नी प्रतिभा पोटे एक मुलगा एक मुलगी आणि ८० वर्षाच्या सासूबाई आहेत. प्रतिभा पोटे यांना पोटाचा विकार असून त्यांची प्रकृती अस्वस्थ असते. अशा अल्पभूधारक शेतकऱ्याला सिएनएच फायनान्स कंपनीने ट्रॅक्टर करिता कर्ज दिले. जर शेतकऱ्याने आत्महत्या केली असेल तर इन्शुरन्स कर्जाचा क्लेम करून ते प्रकरण निकाली काढावे,



असे मुख्यमंत्र्यांचे आदेश आहेत. असे असताना फायनान्स कंपनीचे अधिकारी स्वप्नील भुयार यांनी कर्मचाऱ्यांना १४ ऑगस्टला पोटे यांचा ट्रॅक्टर घरून उचलून आणावा, असे आदेश दिले. कर्मचाऱ्यांनी ट्रॅक्टर तो ट्रॅक्टर उचलून नेला. यावेळी प्रकाश पोटे यांच्या घरी ८० वर्षाच्या सासू होत्या. त्यांनी याला विरोध ही केला. मात्र कंपनी कर्मचाऱ्यांनी त्यांना डावलून ट्रॅक्टर उचलून नेला.

प्रतिभा पोटे यांनी सर्व परिस्थिती भाजप जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांना सांगताच त्यांनी तात्काळ घटनेची दखल घेतली. तसेच फायनान्स कंपनीने



जर ४८ तासांत ट्रॅक्टर शेतकऱ्याला परत न दिल्यास ट्रॅक्टर कंपनीवर धडक देऊ, असा अल्टीमेटम दिला होता. त्यानुसार आ दिनांक २८ ऑगस्ट रोजी नांदगाव पेठ येथील श्री चक्रधर ट्रॅक्टर शोरूम वर शेकडो कार्यकर्त्यांसह धडक दिली. व आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटुंबाला तो ट्रॅक्टर परत मिळवून दिला.

यावेळी कार्यकर्त्यांनी किसानो के सन्मान मे, भाजप उतरी है मैदान मे असे नारे देत आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्याचा ट्रॅक्टर शोरूम मधून बाहेर काढला. यावेळी रविराज देशमुख शोरूम च्या मॅनेजमेंट वर चांगलेच आक्रमक झाले. आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यावर अन्याय करणाऱ्यावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी यावेळी, रविराज देशमुख यांनी पोलीस प्रशासनाकडे केली. यावेळी जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्यासह शंतनू देशमुख, संजय चांडक, अमित बाभूळकर, सचिन इंगळे, विजय गाडगे, धनंजय उमप, इक्बाल हुसेन, मोरेश्वरराव मुळे, उमेश श्रीखंडे, साधनाताई म्हस्के, योगेश देशमुख, विकास देशमुख, भरत महल्ले, वैभव गायकी, राजकुमार पावडे, श्याम साबळे, स्वप्नील भुयार, आशिष पोटे, राजेंद्र दारोकार, सौरभ पोटे, ईश्वर दारोकर, दर्शन संभे, अमोल संभे, श्याम संभे, सर्वेश फुसे, गोलू पठाण, प्रफुल दारोकर, अज्जूभाऊ पठाण, सुजल इखार, श्रीकांत मांडवे, निलेश चौधरी, अनुज म्हस्के, दिनेश बीजवे, राजेश भेंडे, शरद तालन आदींसह आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटुंबातील सर्व सदस्य व शेकडो शेतकरी, कार्यकर्ते पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा: रविराज देशमुख

एकीकडे केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील फडणवीस सरकार यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना कर्जात सवलत देण्यासोबतच त्यांच्या परिवाराचे जीवनमान उंचावण्यासाठी वेगवेगळ्या योजना काढत आहे, तर दुसरीकडे मात्र फायनान्स कंपनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना त्रास देत असल्याचे प्रकरण समोर आले आहे. विशेष म्हणजे या कंपनीने स्वातंत्र्य दिनापूर्वी म्हणजेच १४ ऑगस्ट ला त्या परिवाराच्या घरून हा ट्रॅक्टर उचलून नेला. त्याविरोधात आज आम्ही ट्रॅक्टर कंपनीच्या शोरूम वर धडक देऊन जप्त केलेला ट्रॅक्टर आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला परत करून दिला, आणि शेतकऱ्यावर अन्याय करणाऱ्या फायनान्स कंपनीच्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी यावेळी आम्ही शिरखेड पोलीस स्टेशनचे ठाणेदार सचिन लुले यांच्याकडे केली आहे, अशी प्रतिक्रिया रविराज देशमुख यांनी यावेळी दिली

# संतनगरीत ४६२ दिंड्यांसह हजारो भक्तांचा मेळा

## श्रींच्या ११५ व्या पुण्यतिथी सोहळ्याची थाटात सांगता...

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९शेगाव–** संतनगरी शेगाव येथील गजानन महाराज संस्थान, शेगांव येथे गजानन महाराज यांच्या ११५ व्या पुण्यतिथी उत्सवाची आज गुरुवारी २८ ऑगस्ट रोजी थाटात सांगता झाली. २४ ते २८ ऑगस्ट दरम्यान यनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. यावेळी ४६२ दिंड्या सह हजारो भाविकांची मंदियाळी जमली होती. यावर्षी पुण्यतिथी उत्सवांत श्रींचे सेवेत ४६२ दिंड्यांनी सहभाग घेतला. यापैकी



नियमांची पूर्तता केलेल्या एकूण ७३ नविन दिंड्यांना १० टाळ, १ विणा, १ मृदंग, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, एकनाथी भागवत असे संत वायय आणि श्री माऊली पताका वितरीत करण्यात आल्या.जुन्या दिंड्यांना भजनी साहित्य दुरूस्तीकरीता सानुग्रह अंशदान व इतर व्यवस्थेकरीता सहयोग देण्यात आला. तसेच उत्सवा निमित्य आलेल्या भजनी दिंड्यां मधील वारकऱ्यांची भोजन प्रसादाची व्यवस्था तसेच प्रथमोपचार केंद्राची सुविधा विसावा संकूल येथे करण्यात आली. तसेच उत्सव काळात शेगांवसह शाखा पंढरपूर, आळंदी, त्र्यंबकेश्वर, पंपासरोवर, ओंकारेश्वर, गिरडा या शाखांवर श्रींचा समाधि उत्सव साजरा करण्यात आला. १लाख १८ हजारावर भक्तांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. शेगाव संस्थान तर्फेही माहिती देण्यात आली.

# हमीभावाने कापूस खरेदीसाठी सीसीआय सज्ज

## १ सप्टेंबरपासून मोबाईल ॲपवर नोंदणी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२८अमरावती –** कापसाला वर्षभर हमीभाव न मिळाल्याने हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देणारी बातमी आहे. आता शेतकरी थेट मोबाईल ॲपद्वारे स्वतःची नोंदणी करून शासनमान्य दराने कापसाची विक्री करू शकणार आहेत. कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सीसीआय)ने यंदा कपास किसान हे विशेष ॲप उपलब्ध करून दिले असून, १ सप्टेंबरपासून शेतकरी त्यात नोंदणी करू शकतील. शेतकऱ्यांनी नोंदणीसाठी सातबारा उतारा, पेरणी क्षेत्राची ऑनलाइन नोंद, आधारकार्ड व अन्य आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी लागतील. दरवर्षी शासनमान्य भावाने खरेदीसीसीआय दरवर्षी



शासनमान्य भावाने कापसाची खरेदी करत असते. यंदा शासनाने मध्यम स्टेपल कापसासाठी ७,७१० रुपये तर लांब स्टेपल कापसासाठी ८,८१० रुपये क्विंटल इतका दर जाहीर केला आहे. हा दर १ ऑक्टोबरपासून लागू होणार असून, तो गतवर्षीच्या तुलनेत तब्बल ५८९ रुपये जास्त आहे.अमरावती जिल्ह्यातील १० केंद्रांवर खरेदीसाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. केंद्र फायनल झाल्यावर १ ऑक्टोबरपासून कापसाची प्रत्यक्ष खरेदी सुरू होईल. तोपर्यंत सप्टेंबर महिन्यात शेतकऱ्यांना ॲपद्वारे नोंदणी करण्याची संधी उपलब्ध असेल.गेल्या वर्षभरात शेतकऱ्यांना हमीभाव मिळालाच नाही. उन्हाळ्यात दरवाढीची अपेक्षा असतानाही दरात मोठी घसरण झाली आणि शेतकऱ्यांना मिळेल त्या भावात कापूस विकावा लागला. त्यामुळे यंदा शासनमान्य दराने सीसीआय खरेदी सुरू होणार असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

# शहरातील वाहतूक कोंडीवर तातडीने उपाययोजना करणार - जिल्हाधिकारी येरेकर

## नवीन पूल बांधण्याच्या शक्यता पडताळणारपूल बांधणी संदर्भात रेल्वेशीही चर्चा सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती,**
अमरावती बडनेरा रेल्वे मार्गावरील वाहतुकीसाठी असलेला पूल क्षतीग्रस्त झाल्याने वाहतुकीसाठी बंद करण्यात आलेला आहे. यामुळे शहरात वाहतुकीची कोंडी निर्माण झाली असून याबाबत सर्व शक्यता पडताळून पाहण्यास जात आहे. लवकरच वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात येतील, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात शहरातील वाहतूक व्यवस्थेबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रतीक गिरी, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉक्टर मेघा वासनकर आदी उपस्थित होते.

आमदार संजय खोडके यांनी शहरातील वाहतूक व्यवस्था नियंत्रित करण्यासाठी पर्यायी रस्त्याबाबत गुगल मॅपद्वारे सूचना करण्यात येत आहे. त्याचे प्रात्यक्षिक यावेळी करण्यात आले. तसेच गर्दी टाळण्याकरिता नेहरू मैदान येथे तात्पुरती व्यवस्था करण्यात यावी. नेहरू मैदान या पर्यायी रस्त्यामुळे बरीचशी वाहतूक नियंत्रित करण्यास मदत होईल, असे सांगितले.आमदार सुलभा खोडके यांनी रेल्वेने सदर पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे आवश्यक होते. सण उत्सवाच्या काळात अचानक रस्ता बंद केल्यामुळे






नागरिकांची तारांबळ उडाली आहे. यासह मुख्य बाजारपेठेतील चौकात असलेल्या पारधी समाजामुळे वाहतुकीवर परिणाम होत असल्याने याबाबत ठोस निर्णय घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.रेल्वे मार्गावरील उडाणपूल क्षतीग्रस्त झाल्या मुळे वाहतूक नियंत्रणाची समस्या निर्माण झाली आहे. नागरिकांना समस्या निर्माण होऊ नये यासाठी वाहतूक शाखा कार्य करीत आहे. उडाणपुलाच्या कामाबाबत रेल्वेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली आहे. तसेच शासनाच्या निर्देशानुसार उडाणपूल बांधावयाचे झाल्यास यासाठी लागणारे अंदाजपत्रक तयार करावे लागेल. तसेच पर्यायी रस्त्याची जागा कुणाला दिली असल्यास याचीही पाहणी करावी लागणार आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महापालिकेने खातरजमा करावी. पर्यायी रस्त्याची जागा डीपी रस्त्यावर असल्याबाबत बघण्याचे महापालिकेला सूचना केल्या. सध्या शहरात गणेशोत्सव असल्यामुळे वाहतुकीची सद्यःस्थिती जिल्हाधिकारी यांनी जाणून घेतली.

# वरुडमध्ये उद्याला विदर्भस्तरीय भव्य खुली गीतगायन स्पर्धा 'स्वर विदर्भाचा'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९वरुड,** स्व. वामनराव केशवराव देशपांडे कला व क्रीडा अकादमी, पांढरघाटी, शाळा व्यवस्थापन समिती पांढरघाटी तसेच सूरसंगम टीचर्स म्युझीकल ग्रुप, वरुड यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वर विदर्भाचा' या विदर्भस्तरीय भव्य खुल्या गीतगायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा विदर्भातील नवोदित गायक-गायिकांसाठी तसेच संगीतप्रेमींसाठी एक सुवर्णसंधी ठरणार असून विविध आकर्षक बक्षिसांची उधळण आयोजकांनी केली आहे. प्रथम बक्षीस १५,०००, द्वितीय बक्षीस १०,०००, तृतीय बक्षीस ५,००० तसेच प्रोत्साहनपर २,००० ची तीन बक्षिसे आणि १,००० ची पाच बक्षिसे अशा स्वरूपात एकूण रोख बक्षिसांची सोय करण्यात आली आहे.

**स्पर्धेचे वेळापत्रक**

शनिवार, ३० ऑगस्ट २०२५ रोजी ऑडिशन राऊंडची पहिली फेरी सकाळी ९ वाजता सुरू होईल.दुसरी फेरी त्याच दिवशी दुपारी ३ वाजता होणार




आहे.या दोन्ही फेर्या अष्टविनायक सभागृह, पोलीस स्टेशन रोड, वरुड येथे होणार आहेत.ऑनलाईन नोंदणीची शेवटची तारीख २९ ऑगस्ट २०२५ सायंकाळपर्यंत असून नोंदणी करणाऱ्या स्पर्धकांना प्राधान्य दिले जाणार आहे.ही स्पर्धा ८ वर्षावरील सर्व वयोगटांसाठी खुली असून प्रत्येक स्पर्धकाला सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. ऑडिशन राऊंडमधून निवड झालेल्या टॉप २५ स्पर्धकांची अंतिम फेरी गुरुवार, ४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता अष्टविनायक सभागृह, वरुड येथे पार पडणार आहे. अंतिम फेरीत विजेत्यांचा सत्कार व बक्षिस वितरण विदर्भातील नामांकित मान्यवरांच्या उपस्थितीत होईल.

या भव्य स्पर्धेच्या आयोजनात कला व क्रीडा अकादमीचे अध्यक्ष नामदेव सानप, मुख्याध्यापक सुधीर कांबळे, सरपंच राहुल फुले, कोषाध्यक्ष नरेंद्र पाटील, सॉफ्टवेअर इंजिनिअर रितेश कुबडे, सहसचिव भारतभूषण चौधरी, समिती अध्यक्ष जगदीश परतेती आदी समिती सदस्य परिश्रम घेत आहे.

## स्वयंभू गणपती मंदिर दोनद येथे गणेश चतुर्थी निमित्त

# शिवसेनेतर्फे वयोवृद्धांना ब्लँकेट वाटप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नांदगाव पेठ**
भारतीय संस्कृतीत गणेश चतुर्थी हा सण विघ्नहर्ता श्री गणरायाच्या आराधनेसोबतच सामाजिक उपक्रम आणि सेवा कार्यासाठीही प्रेरणादायी मानला जातो. याच पवित्र दिवशी, दोनद येथील स्वयंभू गणपती मंदिरात शिवसेना अमरावती तालुका तर्फे वयोवृद्धांना ब्लँकेट वाटपाचा स्तुत्य उपक्रम पार पडला.गणेश चतुर्थीच्या मंगलमय वातावरणात आयोजित या कार्यक्रमात ३१ वयोवृद्धांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. थंडीत वयोवृद्धांना ऊब मिळावी आणि त्यांच्या जीवनात समाधानाचे क्षण नांदावेत या भावनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या वेळी वामनराव गिरी, डॉ. चंद्रशेखर गिरी, माजी जि प सदस्य नितीन हटवार , डॉ. नरेंद्र निर्मळ, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व पोलीस पाटील सतीश गोटे, मनोज मोरे, मंदिराचे विश्वस्त विनायकराव मोरे, बाबू मोरे, गजाननराव मोरे, विनोद मंडळकर, पोलीस पाटील विजय इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी वयोवृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद व कृतज्ञतेचे हास्य खुलले. धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम घडविणारा हा उपक्रम गणेशोत्सवाचे खरे वैभव अधोरेखित करणारा ठरला.गणेश चतुर्थीच्या पवित्र दिवशी व सेवाभावाच्या वातावरणात संपन्न झालेला हा उपक्रम गावकऱ्यांच्या मनात आदर्शवत ठरला असून यामुळे शिवसेनेच्या सामाजिक कार्याला नवी दिशा मिळाली.

# तिवसाघाटमध्ये अस्वच्छतेचा कहर!

## ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणाने नागरिकांचे जीव धोक्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९वरुड -**
तालुक्यांतर्गत येत असलेल्या तिवसाघाट गावामध्ये सध्या अस्वच्छतेचे भीषण संकट ओढवले आहे. रस्त्यावर साचलेला कचरा, गटाऱ्यांमधील सांडपाणी व जागोजागी निर्माण झालेली डबकी यामुळे गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ग्रामपंचायत स्वच्छतेसाठी लाखो रुपये खर्च झाल्याचा दावा करते, पण प्रत्यक्षात गावात आजारपणाचा फैलाव वाढत असून तापाची साथ गंभीर स्वरूप धारण करू लागली आहे. गावातील लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांना ताप, अंगदुखी व डेंग्यू-चिकुनगुनियासारख्या रोगांची भीती निर्माण झाली आहे. आरोग्य विभागाने देखील गावात तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली असताना ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष समोर येत आहे.

नागरिकांनी वेळोवेळी ग्रामपंचायतीकडे स्वच्छतेबाबत तक्रारी केल्या. मात्र, त्या फाईलपुरत्याच मर्यादित राहिल्याचे दिसत आहे. ग्रामपंचायत फक्त कर वसुली करण्यात व्यस्त आहे, पण गावकऱ्यांच्या आरोग्याकडे कुणाचे लक्ष नाही, अशी बोचरी



टीका ग्रामस्थांनी केली. गावात मोठ्या प्रमाणात स्वच्छता मोहीम राबवावी. डास निर्मूलनासाठी नियमित फवारणी करावी. आरोग्य शिबिर घेऊन गावकऱ्यांची तपासणी व मोफत औषधोपचार करावा.

गावातील जनतेचे आरोग्य धोक्यात असताना ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष ही गंभीर बाब आहे. निधी असूनही तो योग्य ठिकाणी न वापरल्यामुळे नागरिक आजारी पडत आहेत, हे प्रशासनाचे अपयशच आहे. तिवसाघाटमध्ये स्वच्छतेसाठी तातडीने ठोस पावले उचलली नाहीत तर येणाऱ्या काळात भीषण साथ पसरून मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# शेतपिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती,** ऑगस्ट महिन्यात जिल्ह्यात विविध भागात अतिवृष्टी झालेली आहे. यामुळे शेतपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीची शासनातर्फे मदत देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतपिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे. जिल्ह्यात जून, जुलै महिन्यासह ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी झाली आहे. यामुळे शेतपिके बाधित झालेली आहे. एकट्या ऑगस्ट महिन्यात ४४ हजार ५८८ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. यात २७२ हेक्टर जमीन खरडून गेली आहे. अतिवृष्टीमुळे कापूस, तूर, सोयाबीन, धान, मका आदींचे नुकसान झाले आहे. ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टीमुळे बाधित ५३ कुटुंबातील २१६ जणांना स्थलांतरित करण्यात आले आहे. अतिवृष्टीमुळे ८९६ घरांची अंशतः पडझड झाली आहे, तर १४ घरांची पूर्णता पडझड झाली आहे. आठ झोपड्या, गोठ्यांची पडझड झाली असून तीन व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. यात एक व्यक्ती जखमी झाली आहे. तसेच २४ लहान, तर १९ मोठे जनावरे मृत्युमुखी पडले आहेत.शेतपिकांच्या नुकसानीत शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल. शेतकऱ्यांच्या शेतपिकांच्या नुकसानीपोटी शासनाकडून वेळोवेळी मदत केली जाते आहे. यासाठी शासन स्तरावर पंचनामे सादर होणे आवश्यक आहे. त्यामुळे



अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतपिकांचे तातडीने पंचनामे करावेत, तसेच या पंचनाम्यापोटी आवश्यक असणाऱ्या मदतीच्या रकमेची मागणी शासनाकडे नोंदवावी, असे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे.-

# ग्रंथालय, ग्रंथमित्र पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती,**
राज्य शासनातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार, तसेच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक ग्रंथमित्र पुरस्कार देण्यात येत आहे. यासाठी इच्छुकांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

शहरी व ग्रामीण विभागातील चारही वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १ लाख रूपये, ७५ हजार रुपये, ५० हजार रुपये, २५ हजार रुपये रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येते.

राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी ५० हजार रुपये, तसेच राज्यातील प्रत्येक महसूली विभागातील प्रत्येकी एक उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी २५ हजार रुपये रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येते.

सन २०२४-२५ या वर्षाच्या पुरस्कारासाठी इच्छुक असणारी ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक ग्रंथमित्र यांनी विहित नमुन्यातील अर्ज आणि आवश्यक कागदपत्रांसह दि. ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत तीन प्रतीत जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्याकडे पाठवावेत, असे आवाहन ग्रंथालय संचालनालयाचे प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

# मराठा आंदोलकाचा हार्टअटॅकने मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९जुन्नर-** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील आणि अनेक आंदोलक मुंबईच्या दिशेने येत असतानाच एक दुःखद बातमी समोर आली आहे. मराठा समाजासाठी लढ्यात सहभागी असलेल्या एका आंदोलकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.

मृत्यू झालेल्या आंदोलकाचं नाव सतीश देशमुख असून ते मूळचे बीड जिल्हयातील केज



तालुक्यातील वडगावचे रहिवासी आहेत.

सतीश देशमुख हे गेल्या अनेक दिवसांपासून आंदोलनात सक्रिय सहभागी होते. ते मुंबई मोर्चासाठी निघाले असतानाच जुन्नरमध्ये अचानक त्यांची प्रकृती खालावली. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या पश्चात पत्नी संध्या, मुलगा प्रसाद आणि वृद्ध आई पुष्पाबाई असा परिवार आहे.

या घटनेने मराठा समाजावर शोककळा पसरली आहे. आंदोलनाच्या उंबरठ्यावरच आपल्या सहकाऱ्याचा मृत्यू झाल्याने सहभागी आंदोलक भावनिक झाले आहेत. सतीश देशमुख यांच्या निधनाने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, गावात हळहळ व्यक्त होत आहे.-

# अकोल्यात ढगफुटी सदृश पाऊस! मुसळधार पावसाने दाणादाण, वृक्ष उन्मळून पडले, नदी-नाले तुडुंब



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अकोला**

ढगफुटी सदृश्य पावसाने अकोला शहरासह जिल्ह्यातील विविध भागाला अक्षरश: झोडपून काढले. वादळी वारा, विजांच्या कडकडाटासह गुरुवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास जोरदार पावसाला सुरुवात झाली. या पावसामुळे दाणादाण उडाली. अनेक ठिकाणी वृक्ष उन्मळून पडले असून सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. पावसामुळे गणेशोत्सवात जलमय वातावरण झाले. नदी, नाले भरभरून वाहत असून प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला.

अकोला जिल्ह्यात गेल्या काही दिवसांने पावसाने विश्रांती घेतली. त्यामुळे वातावरणात उकाडा वाढला होता. गणरायासोबतच पावसाचे देखील आगमन झाले. गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण आहे. काळी भागात पावसाची रिपरिप सुरुच होती. बुधवारी विविध भागात तुरळक स्वरूपाचा पाऊस झाला. जिल्ह्यात गेल्या २४ तासांत सरासरी १६.८ मि.मी. पावसाची नोंद झाली. यामध्ये अकोट ३८.६, तेल्हारा ११.८, बाळापूर ३.९, पातूर १५.४, अकोला २४.६, बार्शीटाकळी ८.९ आणि मूर्तिजापूर तालुक्यात ५.४ मि.मी. पाऊस पडला आहे.

गुरुवारी दिवसभर ढगाळ वातावरण होते. काही भागात पावसाच्या सरी कोसळल्या. सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास अचानक ढग दाटून आले. मुसळधार पावसाला सुरुवात झाली. सुमारे एक तास हा मुसळधार पाऊस सुरूच होता. या जोरदार पावसामुळे शहरातील सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. नाल्याचे पाणी रस्त्यावर आले. मोठी वृक्ष उन्मळून पडली. ऐन गणेशोत्सवात ढगफुटी सदृश्य पावसाचा मोठा फटका बसला आहे. या पावसामुळे शहरातील नागरिकांची धावपळ झाली. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांची चांगलीच तारांबळ उडाल्याचे चित्र आहे.महानगरपालिकेच्या यंत्रणा तातडीने कामाला लागल्या असून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शहराच्या विविध भागातील वीज पुरवठा खंडित झाला. अनेक ठिकाणी वीजवाहिन्या तुटल्या आहेत. वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून युद्धपातळीवर काम सुरू करण्यात आले आहे.

**पुढील तीन दिवस पावसाचा अंदाज**

अकोला जिल्ह्यात ३० ऑगस्टपर्यंत पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे. पावसामुळे नदी, नाले व तळ्यांतील पाणीसाठ्यात वाढ झाली. त्यामुळे पाण्यात शिरण्याचे अनावश्यक धाडस करू नये. पूर आलेल्या रस्त्यावरून गाडी चालविणे टाळावे. पाणीसाठ्याजवळ जाऊ नये. वीज व पावसापासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्यात यावा. या परिस्थितीत झाडाखाली आश्रय घेऊ नये. नदीकाठाजवळील गावातील गावकऱ्यांना सतर्कतेची सूचना देण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# दर्यापूर तालुक्यातील ७४ गावांमध्ये होणार स्वयंचलित हवामान केंद्र सुरू

## केंद्र शासनाच्या विंडस् या योजनेतून स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी नुकसानीची व हवामान विषयक अचूक माहिती मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ दर्यापूर**

तालुक्यातील ७४ गावांमध्ये केंद्र शासनाच्या विंडस् या योजनेतून ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्यात येणार असून जागा निवड करण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने ग्रामपंचायतीशी संपर्क साधण्यात येत असून लवकरच तालुक्यातील गावागावात स्वयंचलित हवामान केंद्र उभे राहणार असल्याने नैसर्गिक आपत्तीत झालेल्या नुकसानीची व हवामान विषयक अचूक माहिती मिळणार असल्याने शासकीय धोरण,अनुदान व योजनेसाठी याचा मोठा फायदा होणार आहे.महावेध प्रकल्पांतर्गत राज्यात महसुल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. सदर हवामान केंद्रांद्वारे प्राप्त होणारी माहिती ही ज्या ठिकाणी हवामान केंद्र स्थापन आहे अशा स्थानी असणाऱ्या हवामान



परिस्थितीसंदर्भातील असते. हवामान केंद्र स्थापन असणाऱ्या ठिकाणी हवामान परिस्थिती ही महसूल मंडळामध्ये समाविष्ट असणाऱ्या इतर गावांच्या स्थानिक हवामान परिस्थितीपेक्षा भिन्न असण्याची मोठ्या प्रमाणावर शक्यता असते. ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची स्थापना केल्यास हवामान विषयक ग्रामपंचायत निहाय विशिष्ट माहिती प्राप्त होणार आहे.

> व्हेदर इन्फॉर्मेशन नेटवर्क डेटा सिस्टिम ( **WINDS** ) ही एक एक केंद्र शासनाचे महत्त्वकांक्षी योजना आहे, ज्यामध्ये हवामान माहितीचे जाळे तयार करून अचूक हवामान अंदाज मिळवणे व लोकांपर्यंत पोहोचवणे हा उद्देश आहे. याचा उपयोग शेती, आपत्ती व्यवस्थापन आणि धोरण आखणीसाठी केला जाईल. सद्यस्थितीत प्रत्येक गावातील ग्रामपंचायत मध्ये जागा उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे
>
> **– आरती साबळे , तालुका कृषी अधिकारी, दर्यापूर**

राज्य आपत्ती प्रतिसाद निधी मधून चक्रीवादळ, दुष्काळ, भूकंप, आग, पूर, त्सुनामी, गारपीट, दरड कोसळणे, ढगफुटी, थंडीची लाट व कडाक्याची थंडी या नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना मदत मिळणार आहे. ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणा करण्यात आल्यास अनेक फायदे होणार आहेत.

**फायदे**

चक्रीवादळ, दुष्काळ, आग, पूर, गारपीट, ढगफुटी, थडीची लाट व कडाक्याची थंडी इ. नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने हवामान विषयक माहिती उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने देखिल ग्राम पंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची स्थापना उपयुक्त ठरणार आहे. राज्यातील सर्व गावांमधील हवामान विषयक अचूक माहिती प्राप्त व्हावी, शेतकऱ्यांना हवामानाधारित कृषि विषयक सल्ला व मार्गदर्शन प्राप्त व्हावे, कृषि हवामान क्षेत्रात संशोधनासाठी तसेच नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने हवामान विषयक आवश्यक ती माहिती प्राप्त व्हावी, स्वयंचलित हवामान केंद्रांद्वारे प्राप्त माहितीचा वापर कृत्रीम बुध्दीमत्ता प्रणाली तसेच आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे हवामान विषयक माहितीचे संकलन, विश्लेषण, शेतकऱ्यांना योग्यवेळी मार्गदर्शन इ. बाबींसाठी उपयुक्त ठरणार आहे. तसेच यापूर्वी तालुक्यातील थीलोरी, दारापूर, रामतीर्थ, सामदा, खल्लार,येवदा वडनेर गंगाई व दर्यापूर या ८ महसूल मंडळात स्वयंचलित हवामान केंद्र होते.

**जागा निवड प्रक्रिया**

स्वयंचलित हवामान केंद्रासाठी जागा निवड अतिशय महत्त्वाची असणार असून जागा निवडताना ग्रामपंचायतीतील सर्व समाविष्ट गावांमध्ये शासकीय, अर्धशासकीय जागांना प्राधान्य देण्यात येणार आहे. पण अनेक गावांमध्ये गावठाणच्या जागा शिल्लक नसल्याने जागेचा प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे तो सोडवणे अडचणीचे ठरत आहे. सर्वसाधारणपणे स्वयंचलित हवामान केंद्र उभारणी करीता ५ मीटर ७ मीटर जागा उपलब्ध करुन द्यावयाची आहे. तापमान व आद्रता आद्रतार सेन्सर तर जमिनीपासून जमिनीपासून १.२५ मी २ मी उंचीवर स्थापित केले जावेत व वाऱ्याचा सेन्सर जमिनीपासून ३ मी उंचीवर स्थापित केला जाणार आहे.

# दुचाकीच्या अपघातात अष्टविनायक बँकेच्या व्यवस्थापकाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ मोर्शी**

बेनोडा येथील अष्टविनायक नागरी क्रेडीट को ऑप सोसायटी या बँकेत व्यवस्थापक पदावर कार्यरत असलेल्या एका युवकाचा अमरावती येथे आपल्या घरी परत जाताना निंभी गावाजवळ अपघाती मृत्यू झाल्याची घटना दि. २८ ऑगस्ट ला संध्याकाळी ६ चे दरम्यान घडली.



आशिष मधुकर शेरेकर वय ४६ असे अपघातात मृत्यू झालेल्या युवकाचे नाव असून आशिष शेरेकर हे बेनोडा येथील अष्टविनायक नागरी क्रेडीट को ऑप सोसायटी या बँकेत व्यवस्थापक पदावर कार्यरत आहे. दि.२८ ऑगस्टला ते बँकेतील कामकाज करून संध्याकाळी ६ चे दरम्यान आपल्या घरी अमरावती येथे त्यांच्या युनिकॉर्न गाडी क्र. एम एच २७ ए डब्ल्यू ३८३० ने परत जात होते.

दरम्यान निंभी येथे असलेल्या पहेलवान बाबा मंदिराजवळ विरुद्ध दिशेने येणाऱ्या आयशर गाडी क्र एम एच २७ बीसी ३१९६ मध्ये त्यांची गाडी आल्याचे असल्याचे समजते. यात आशिष हे गंभीर जखमी झाले त्यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषीत केले. शिरखेड पोलीस पुढील तपास करीत आहे.

# अंजनगाव सुर्जी परिसरात ट्रॅफिक सिग्नल बसवा; गिरीश लोकरे यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी परिसरात दिवसेंदिवस वाढत चाललेली लोकसंख्या व वाढत्या वाहनांच्या संख्यान मुळे शहरात मोठ्या प्रमाणात वाहतुकीची समस्या वाढली आहे. तसेच शहरातूनच राष्ट्रीय महामार्ग गेला असुन महामार्ग मुळे शहर दोन भागात झाल्या कारणाने वाहतूक कोंडी नेहमीचीच झाली आहे. तसेच या महामार्ग लगत दर्यापूर, अकोला, अमरावती राज्य मार्ग सुद्धा आहे,एकी कडे राष्ट्रीय महामार्ग लगत नवीन डेव्हलप कॉलनी,विद्युत वाहिनी विभाग,पेट्रोल पंप,बस स्टँड,शासकीय रेस्ट हाऊस,शासकीय शहानुर जलसिंचन कार्यालय, शहरात जाणारा रस्ता श्री संत रूपलाल महाराज विठ्ठल मंदिर पासुन मुख्य बाजार पेठ कडे जाणारा रस्ता,आठवडी बाजार व ग्रामीण रुग्णालय कडे जाणारा रस्ता,तहसील कडे जाणारा रस्ता तर दुसरी कडे कृषी कार्यालय, शाळा महाविद्यालय, मार्केट, नवीन कॉलनी कडे जाणारा रस्ता , मार्केट लाइन, कृषी उत्पन्न बाजार समिती, जुना बस स्टँड, सहीत या रस्त्याने ग्रामीण भागात जाणारे रस्ते असून प्रत्येक ठिकाणी ये जा करण्या करीता वाहन चालकांना महामार्ग असल्या कारणाने जीव मुठीत घेऊन वाहन चालावे लागते. तर शहरातील डी पी रोड, पान अटाई, शाळा म हा वि द्या ल य , दवाखाने,टाकरखेडा जाणारा चौक, अश्या सर्व ठिकाणी वाहनाची रांग किंवा बेशिस्त वाहन चालक यांच्या मुळे सर्व सामान्य वाहन चालकांना त्रास होत आहे तर अश्या प्रत्येक ठिकाणी लहान मोठा अपघात झाले, जुना बस स्टँड येथे ग्रामीण रुग्णालयात एखादा रुग्ण नेताना सुद्धा म्ब्युलन्स चालकांना मोठी कसरत करावी लागते यासर्व बाबीं कडे वाहतूक पोलीस सहीत पोलीस निरीक्षक यांनी लक्ष देण्याची गरज आहे कारण अनेक छोटे मोठे अपघात झाले. अनेक वाहन चालक या बेशिस्त व्यवस्थेमुळे त्रस्त आहेत त्यामुळे जनतेच्या हिता साठी व वाहन चालकांच्या सुरक्षा संबंधी अंजनगाव सुर्जी शहरात वाहतूक कोंडी सोडविण्या करीता वाहतूक सिग्नल असणे गरजेचे असल्याने सामाजिक कार्यकर्ता गिरीश लोकरे यांनी तहसीलदार यांना निवेदन देऊन मागणी केली आहे.

# शरीर स्वास्थ्यासाठी खेळाडू वृत्ती ठेवा - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## विद्यापीठातील क्रीडा - शारीरिक शिक्षण विभाग व पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्यावतीने राष्ट्रीय क्रीडा दिवसानिमित्त क्रीडा स्पर्धांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ अमरावती**

शरीर, मन स्वास्थ्यासाठी खेळ महत्वाचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी खेळाडू वृत्ती ठेवावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग आणि पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिवसानिमित्त आयोजित विविध क्रीडा स्पर्धांचे कुलगुरूंनी फित कापून उद्घाटन केले, त्याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. अजयपाल उपाध्याय यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. डॉ. अजयपाल उपाध्याय मार्गदर्शन करतांना म्हणाले,




खेळ हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असून, आरोग्य हेच खरे धन आहे. पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत म्हणाल्या, संघभावना, सहकार्य, शिस्त, प्रामाणिकपणा या गुणांचा विकास खेळांतूनच होतो. खेळाचे जीवनात अपार महत्व असून प्रत्येकाने अभ्यासासोबतच खेळालाही तितकाच वेळ द्यावा. विद्यार्थ्यांसाठी व्हॉलिबॉल व रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये एम.बी.ए., शारीरिक शिक्षण, वसतीगृह, भौतिकशास्त्र, गृह विज्ञान, संगणकशास्त्र, विभागाच्या विद्यार्थी संघाने भाग घेतला. 'एक घंटा खेल के मैदान मै' असा नारा देऊन विद्यार्थ्यांना क्रीडा दिवसानिमित्त शपथ देण्यात आली. याप्रसंगी विभागाचा माजी खेळाडू डॉ. अभिजीत इंगोले यांना श्री शिवछत्रपती पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांचा शाल, श्रीफळ व मानचिन्ह देऊन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला डॉ. हेमंतराज कावरे, डॉ. अतुल बिजवे, डॉ.विजय निमकर, डॉ.निलेश इंगोले, डॉ.सौरभ त्रिपाठी, कु. सविता बावनथडे, विविध विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. कु. निकिता भट हिने आभार मानले. पल्लवी शिंदे, शीतलदेवी यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

# श्री हव्याप्र मंडळाच्या जिम्नॅस्टिक्स खेळाडूंचा सुवर्ण लौकिक

## राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत ३ सुवर्ण ९ रौप्य पदक व १ कांस्य पदक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ अमरावती**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ सातत्याने स्थानिक खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा व्यासपीठ व यश मिळवून देत आहे. प्रामुख्याने जिम्नॅस्टिक्स सारख्या आंतरराष्ट्रीय खेळामध्ये स्थानिक खेळाडूंना मिळणारे दर्जेदार प्रशिक्षणाद्वारे राज्य व राष्ट्रीयस्तरावर मंडळाचे जिम्नॅस्टिक्स खेळाडू मंडळाचे व अमरावती शहराला लौकिक वाढवत आहे. आता त्यामध्ये नव्याने भर पडली ती डेहराडून येथील राष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स अजिंक्य स्पर्धेच्या सुवर्ण यशाची. मंडळाच्या जिम्नॅस्टिक्स खेळाडूंनी या राष्ट्रीय स्पर्धेत उत्कृष्ट क्रीडा प्रदर्शन सादर करीत ३ सुवर्ण व ९



रौप्य व १ कांस्य पदक पटकावले. मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य व सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करीत पुढील यशस्वी वाटचालीकरीता त्यांना शुभेच्छा दिल्यात.

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती जिल्हा हौशी जिम्नॅस्टिक्स संघटनेच्या प्रशिक्षण केंद्रावर नियमित सराव करणाऱ्या खेळाडूंनी दि.७ ते १० ऑगस्ट दरम्यान महाराणा प्रताप स्पोर्टस् कॉलेज इंडोर स्टेडियम रायपूर, डेहराडून, येथे उत्तराखंड जिम्नॅस्टिक्स असोसिएशन व जिम्नॅस्टिक्स फेडरेशन इंडिया द्वारे आयोजीत अ‍ॅक्रोबॅटीक्स व टंबलिंग ट्रम्पोलिन राष्ट्रीय अजिंक्य स्पर्धेत सहभाग घेतला होता.

# यश मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यशाला कवेत घ्या - डी. डी. सोनटक्के

## राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात बडनेराच्या तुळशी व देवयानी करंडे भगिनींचा मानाचा सत्कार





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ नांदगाव पेठ**

यश हे मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावरच मिळते. जागतिकीकरणाच्या युगात शासकीय सेवेतून लोकसेवा करण्याची संधी मिळणे म्हणजे जीवनातील मोठा सन्मान आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य परीट धोबी वरठी समाज महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डी. डी. सोनटक्के यांनी केले.नुकताच नाशिक येथे महाराष्ट्र राज्य धोबी (परिट) वरठी समाज महासंघाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा दिमाखात पार पडला.

या सोहळ्यात समाजातील शैक्षणिक, कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा, कलाकारांचा व खेळाडूंचा उत्साहवर्धक सन्मान करण्यात आला. समाजातील उदयोन्मुख व्यक्तिमत्वांना प्रोत्साहन देणे व पुढील वाटचालीसाठी बळ देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.या कार्यक्रमात बडनेरा (अमरावती) येथील तुळशी विनोद करंडे हिने एम. फार्मसीमध्ये मिळवलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल तरुणाईचे प्रतिनिधित्व करत गौरव मिळवला. तर गुणवंत विद्यार्थी म्हणून देवयानी प्रमोद करंडे हिचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मान झाला. .

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नाशिकचे प्रसिद्ध उद्योजक राजेंद्र आहेर यांनी भूषविले. उद्घाटक म्हणून डी. डी. सोनटक्के यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून युवासेना जिल्हा प्रमुख विक्रम रंधवे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिकच्या पोलीस उपअधीक्षक श्रीमती स्वाती पवार, अकोल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, महाराष्ट्र पोलीस अकॅडमीचे निरीक्षक दुर्गेश शेलार, नाशिकचे सहाय्यक पोलीस आयुक्त मनोज खंडाळे यांच्यासह जितेंद्र सपकाळ, दीपक सुरडकर, चेतन लोखंडे, अमित गवळी, मनोज वाघमारे, जयराम वाघ (महासचिव), मनोज मस्के (प्रसिद्धी प्रमुख), आशिष निंबुरकर (राज्य कार्यालयीन प्रमुख), अशोकराव क्षीरसागर (कार्यकारिणी सदस्य) आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन करंडे भगिनींचा सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून समाजातील तरुणाईने शिक्षण, कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात आपला ठसा उमटवावा, समाजाच्या प्रगतीत सक्रिय योगदान द्यावे आणि यशाची नवी शिखरे गाठावीत, असे आवाहन केले.या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यासाठी अमरावती जिल्ह्यासह राज्यभरातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. बडनेराच्या तुळशी व देवयानी करंडे भगिनींचा झालेला मानाचा सत्कार समाजातील प्रत्येक युवक-युवतीसाठी प्रेरणादायी ठरून समाजाच्या प्रगतीचा मार्ग अधिक सुकर करणारा ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# गौराईच्या खरेदीसाठी बाजारात भाविकांची झुंबड

## गौरीचे विविध प्रकारचे सुंदर मुखवटे उपलब्ध



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

लाडक्या गणरायाचे सर्वत्र आगमन झाल्यानंतर आता बाजारपेठा सजल्या आहेत त्या लाडक्या गौराईच्या मुखवट्यांनी गौराईच्याआगमनाची तयारी भाविक भक्तांच्या घरात जोरदार सुरु आहे . महाराष्ट्रात विविध ठिकाणी निरनिराळ्या पद्धतीच्या गौरीची स्थापना होते. कुठे खड्याच्या, कुठे उभ्या, जेष्ठा आणि कनिष्ठा अशा विविध पद्धतीच्या गौरींचे मनोभावे स्वागत केले जाते.

यावेळी गौरीना नटवण्यासाठी, सजवण्यासाठी तिचे अस्तित्व चारही बाजूंनी प्रसन्न ठेवण्यासाठी गौरीची नेत्रदीपक आरास केली जाते. काही वर्षापूर्वी तेरड्याची मुळे गौर म्हणून पुजली जायची. मात्र, आता पूर्ण गौरी मूर्ती बसवून तिची पूजा करण्याचा ट्रेंड सुरू आहे. त्यामुळे बाजारात गौराईचे सामान घेण्यासाठी भाविकांची मोठी झुंबड पाहायला मिळत आहे.

सध्या बाजारात गौरीचे विविध प्रकारचे सुंदर मुखवटे उपलब्ध आहेत. त्यामध्ये खळी मुखवटा, हसरा मुखवटा, अमरावती मुखवटा, सातारी मुखवटा, महालक्ष्मी मुखवटा आणि एकवीरा मुखवटा आदिना विशेष मागणी आहे.

हे मुखवटे लाकूड, फायबर, पीओपी, प्लास्टिकपासून तयार केले जातात. तर यातील पीओपी चंदन पेंट मुखवटा आणि वॉर्निश पेंट मुखवट्याला अधिक मागणी असून हे मुखवटे ३५० रुपयांपासून २,८०० पर्यंत मिळतात. तर शिवण लाकडापासून बनवलेल्या लाकडी मुखवट्यासह पूर्ण गौराई ही ३५ हजाराला बाजारात उपलब्ध आहे. ज्याची गॅरेंटी किमान ५० वर्षाची आहे. तर, बाजारात पीओपी, फायबर आणि प्लास्टिक मुखवटेही उपलब्ध असून यातील फायबरला अधिक मागणी असून ते जास्त काळ टिकतात. तर, प्लास्टिकमध्ये पारंपारिक पद्धत आणल्यामुळे धान्य भरणे शक्य असल्यामुळे बाजारात त्याची विशेष मागणी आहे.

गौरीसाठी लागणारे सुट्टे हात आणि आशीर्वाद हात यंदा हे दोन प्रकार बाजारात दिसत आहे. आणि या दोन्ही प्रकारच्या हातांची मागणी अधिक आहे. ज्याची किंमत २५० रुपये आहे. तर गौराईला नेसवण्यात येणाऱ्या साडीमध्ये यंदा महाराणी साडीची अधिक क्रेझ आहे. या साड्या गौराईच्या उंचीनुसार मिळतात. किंवा हल्ली शिवून घेण्यांवर नागरिकांचा अधिक भर आहे. तसेच, गौराईला सजवण्यासाठी बाजारात विविध प्रकारचे दागिनेही उपलब्ध आहेत. ज्यामध्ये ठुशी, लक्ष्मीहार, पोत्याची माळ, रत्नजडित मंगळसूत्र, कोल्हापुरी हार, बोरमाळ, तोडे, नथ हे विशेष विकले जात आहेत.

# आझाद हिंद मंडळ गणेशोत्सवात शिर्डी साईबाबा देखाव्याचे भव्य उद्घाटन

## आयुक्त सौम्या शर्मा चांडक व मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा यांच्या हस्ते उद्घाटन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

आझाद हिंद मंडळ, बुधवारा अमरावती आयोजित ९८ व्या गणेशोत्सवात साकारण्यात आलेल्या शिर्डी श्री साईबाबा मंदिराच्या देखाव्याचे भव्य उद्घाटन अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौ. सौम्या शर्मा चांडक व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. संजिता महापात्रा यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात पार पडले.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते श्री गणेशाची आरती झाली. त्यानंतर देखाव्याचे उद्घाटन होऊन उपस्थितांनी शिर्डी साईबाबा मंदिराचे दर्शन घेतले. पुढे पाहुण्यांचा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच ९८ वर्षांचा इतिहास दर्शवणारी माहितीपूर्ण चित्रफीत प्रदर्शित करण्यात आली.

मनोगत व्यक्त करताना सौ. संजिता महापात्रा यांनी देखाव्याचे कौतुक करत मंडळाच्या उपक्रमांची प्रशंसा केली. तर सौ. सौम्या शर्मा चांडक यांनी, आझाद हिंद मंडळाचा गणेशोत्सव हा धार्मिकतेसोबत समाजाला एकत्र



आणणारा सोहळा आहे. अमरावतीचा इतिहास लिहिताना या मंडळाचा उल्लेख नक्कीच होईल, असे प्रतिपादन केले.

या प्रसंगी मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री किशोर बोराटणे व सौ. साधना बोराटणे यांचा मंत्रालयात ओ.एस.डी. पदावर नियुक्तीबद्दल विशेष सत्कार झाला. तसेच शिर्डी साईबाबा देखावा साकार करणारे कलाकार श्री संतोष कनोजिया यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला माजी महापौर विलास इंगोले, माजी खासदार अनंतराव गुढे, माजी आमदार प्रदीप वडनेरे, माजी सभापती विवेक कलोती, ज्ञानेश्वर हिवसे, राजाभाऊ माजलगावकर, चंदूभाऊ पवार, प्रकाशभाऊ सगेकर, संतोष बद्रे, प्रा. गणेश मालोकर, डॉ. किशोर फुले, दिलीप कालोती, दिलीप दाभाडे, सुरेश रतावा, प्रमोद इंगोले, रफिक भाई चिक्कूवाले, सतीश चौधरी, अजित वडवेकर, नंदकिशोर गुम्बळे, शैलेश अग्रवाल, कैलाश गिरोलकर यांच्यासह असंख्य मान्यवर उपस्थित होते.

मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये – अध्यक्ष श्री दीपक गुडधे, स्वागताध्यक्ष प्रवीण मानेकर, कार्याध्यक्ष रामेश्वर उपाध्याय, उपाध्यक्ष राजाभाऊ अडगूलवार, डॉ. प्रथमेश बोके, मो. जावेद साबीर, सचिव निलेश वानखडे, कोषाध्यक्ष नरेंद्र बेनी, सहसचिव तन्मय पिंजरकर, गणेश अग्निहोत्री, शुभम काशीकर, आकाश मोहोड आदी प्रमुख होते.

तसेच मंडळाचे ज्येष्ठ सदस्य भूषण पुसतकर, प्रसाद मोरे, रामाभाऊ चावंडे, दिवाकर चिखलकर, नितीन सराफ, ऍड. विजय संगेकर, मयूर जलतारे, राजेश जायदे, जयंत कलोती, नंदू गुम्बळे, निलेश सराफ, गुड्डू ढोले, संतोष चिखलकर, अजय इंगोले, उदापुरे बंधू, भैया इंगोले, अण्णा करणे, नितीन इंगोले, पांडुरंग रायकवार, राजू हिरपूरकर, सुनील महल्ले, संजय हिरपूरकर, नंदू माकवाने, सुरेश चिखलकर, अशोक बामणगांवकर, ऍड. चंदू डोरले, डॉ. संजय तिरथकर, विशाल फाटे, डॉ. आकाश मोरे, विनोद घोडेगावकर, दीपक इंगोले, किरण उदापुरे, उमेश देशमुख, संजय कदम, नितीन फुसे, मनीष चौधरी, मनीष काजणेकर, अमित काजणेकर, अवी अनासने, संदीप कुटारिया, राजू बोराटणे, सुरेश वैश्य, मदन पुसतकर, नाना उदापुरे, राजा पिंजरकर, सतीश बद्रे, सागर इंगोले, रोशन पुसतकर, अनिकेत नवघरे, किशोर पुसतकर, संजय गुम्बळे, नितीन कोहळे, रवि पाटमासे, सचिन कोहळे, मुन्ना दुलारे, किरण विंचूरकर, प्रेमानंद पुसतकर, अजय पुसतकर, रेवण पुसतकर, प्रथमेश बाखडे, कृष्णा हिवसे, आर्यन ढोले, वेदांत डांगे, राहुल कथलकर, योगेश पुंड, सचिन भेरडे, अशोक पोहेकर, राहुल चिखलकर, विजू गावंडे, सुनील तिप्पट, संजय पाटील यांची उपस्थिती लक्षणीय होती.प्रास्ताविक डॉ. किशोर फुले यांनी तर सुत्रसंचालन संजय मुचळबे यांनी केले.या भव्य उद्घाटन सोहळ्याला हजारो गणेशभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# फायरिंग करून प्राणघातक हल्ला करणारे आरोपी गजाआड

## अमरावती गुन्हे शाखेची तात्काळ व धडाकेबाज कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

अमरावती शहरातील फेजरपुरा भागात फायरिंग करून प्राणघातक हल्ला करणाऱ्या तीन आरोपींना गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ अटक केली आहे. या कारवाईत दोन आरोपींसह एक विधीसंघर्षीत बालक ताब्यात घेण्यात आला असून, सर्वांनी गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

२८ ऑगस्ट रोजी अयान शेख यांनी फेजरपुरा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती की, ते आपल्या वडिलांसोबत दुकानासमोर उभे असताना आरोपी सय्यद अबूजर उर्फ मस्तान (१९), मोहम्मद रेहान (२०) आणि एक विधीसंघर्षीत बालक बाईकवर येऊन त्यांच्यावर शिवीगाळ करत जिवे मारण्याच्या धमक्या देऊ लागले. विरोध केला असता आरोपींनी पिस्तूल व तलवार काढून गोळीबार करत प्राणघातक हल्ला केला.

यावरून फेजरपुरा पो.स्टे. येथे अप. क्र. ७११/२०२५ अन्वये भारतीय दंड विधान व आर्म ॲक्टखाली गुन्हा नोंदवण्यात आला. प्रकरणाच्या गांभीर्याची दखल घेत पोलीस निरीक्षक श्री. संदीप चव्हाण (गुन्हे शाखा) यांनी तातडीने स्वतंत्र पथक तयार करून तपास सुरू केला.

गुप्त बातमीदाराच्या माहितीवरून आरोपी ताब्यातसपोनि मनीष वाकोडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तपास करताना खात्रीलायक माहिती मिळवली की, आरोपी धरुमकाटा परिसरात लपून बसले आहेत. त्यानुसार पथकाने कारवाई करत तिघांनाही शिताफीने अटक केली.कारवाईत सपोनि मनीष वाकोडे, अंमलदार फिरोज खान, सतीश देशमुख, मंगेश लोखंडे, रंजीत गावंडे, नाजीमुद्दीन आदींचा मोलाचा सहभाग होता.

# ५३० कोटी खर्च करून निर्माण केलेला नांदगावपेठ - पांढुर्णा राष्ट्रीय महामार्ग होत आहे खड्डेमय

## अपघातांचे प्रमाण वाढले : रस्ता दुरुस्तीकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्षः रुपेश वाळके यांचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ मोर्शी**

अमरावती जिल्ह्यातील नांदगावपेठ मोर्शी वरूड पांढुर्णा पर्यंत नव्याने निर्माण करण्यात आलेल्या ९६ किलोमीटरच्या सिमेंट रस्त्याच्या राष्ट्रीय महामार्गाला अवघ्या चार ते पाच वर्षामध्येच अनेक ठिकाणी खड्डे व भेगा पडल्यामुळे नांदगावपेठ – पांढुर्णा राष्ट्रीय महामार्गाच्या कामातील दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहे.

नवीन राष्ट्रिय महामार्गावरील सिमेंट रोडवर पडलेल्या भेगा व खड्डे मोठया प्रमाणात असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. राष्ट्रीय महामार्गावर साडेचार–साडेचार मीटर चे असे पॅनल तयार करण्यात आले आहे. या संपूर्ण महामार्गावरील शेकडो पॅनलला भेगा गेल्या असल्यामुळे महामार्गावरील रोड खराब झाला आहे. नांदगाव ते पांढुर्णा महामार्गावरील खराब झालेला हा संपूर्ण रस्ता पुन्हा खोदून नव्याने रास्ता तयार करून या महामार्गावरील मोर्शी येथील नळा नदीवरील अपूर्ण पुलाच्या कामामुळे व दापोरी येथील नदीवरील पुलाच्या अपूर्ण कमामुळे अनेक वाहनांचा अपघात होऊन मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाली असून नांदगाव मोर्शी वरूड पांढूर्णा महामार्गावरील अर्धवट अपूर्ण असलेल्या धोकादायक पुलांची कामे तत्काळ पूर्ण करण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

अमरावती जिल्ह्यातील वरुड, मोर्शी या दोन शहरांसह मध्यप्रदेश व अमरावती शहराला जोडण्यासाठी तयार करण्यात आलेल्या वरुड मोर्शी महामार्गाच्या नूतनीकरनासाठी तब्बल ५३० कोटी खर्च करून या ९६ किलोमीटरच्या नांदगावपेठ – पांढुर्णा महामार्गाचे जेमतेम पाच वर्षांपूर्वी बांधकाम करन्यात आले आहे . मात्र एवढ्या छोट्या कालावधीमध्ये या महामार्गाला अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने नांदगावपेठ ते पांढुर्णा महामार्गावरील सिमेंट रस्त्याच्या कामातील दर्जावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

आधी हा महामार्ग डांबरी रोड चा असल्यामुळे जीवघेने खड्डे पडलेले होते त्यामध्ये अनेक वाहन चालकांना आपले प्राण गमवावे लागले अपघातातून वाहन चालकांना मुक्तता मिळावी म्हणून या महामार्गचे काम करण्यात आले. परंतु नव्याने तयार करून बांधण्यात आलेल्या ५३० कोटी रुपयांच्या या अमरावती – पांढुर्णा महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे, भेगा पडल्यामुळे झालेल्या कामाबाबत आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. या राष्ट्रीय महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी केला आहे.

नांदगाव पेठ ते मध्यप्रदेशातील पांढुर्णा पर्यंत असलेल्या ९६ किलोमीटरच्या या राष्ट्रीय महामार्गात दोन टप्पे आहे. पहिला टप्पा नांदगाव पेठ ते मोर्शी हा ४३ किलोमीटर लांबीचा टप्पा असून यासाठी शासनाने तब्बल २४० कोटी रुपये खर्च करण्यात आले तसेच दुसरा टप्पा हा मोर्शी ते पांढुरणा पर्यंत आहे या ५३ कीलोमीटर लांबीच्या कामासाठी तब्बल २९० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहे परंतु या दोन्ही टप्प्यामध्ये अनेक ठिकाणी सिमेंट रोड खराब झालेला आहे. रुपेश वाळके यांनी अनेक वेळा राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाकडे व संबंधित कंत्राटदाराकडे अनेक वेळा तक्रारी करून सुद्धा त्याची दखल कोणीही घेत नसून सार्वजनिक बांधकाम संबंधित ठेकेदाराच्या दावणीला बांधला असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगत आहे.

### राष्ट्रीय महामार्ग विभाग कुंभकर्णी झोपेत



अमरावती पांढुर्णा राष्ट्रीय महामार्गाचे काम निकृष्ठ दर्जाचे झाले असून अनेक पूलांची कामे अर्धवट आस्थेत आहे राष्ट्रीय महामार्ग खड्डेमय होतांना दिसत आहे अनेक ठिकाणी रस्ता दबलेला असल्यामुळे तो वाहन चालकांना दिसत नसल्यामुळे दोन चाकी चार चाकी वाहन या ठिकाणी उसळतात व वाहनावरून अनेक महिला पुरुष खाली पडतात त्यामध्ये या महामार्गावर अनेक निष्पाप नागरिकांचा बळी जात आहे. राष्ट्रीय महामार्ग विभाग व संबंधित कंत्राटदार यांना अनेक वेळा माहिती देऊन सुद्धा रस्ता दुरुस्तीचे काम करण्यास तयार नसून या गंभीर विषयावर जिल्ह्यातील एकही लोकप्रतीनिधी बोलायला तयार नाही ही शोकांतिका आहे त्यामुळे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या गंभीर प्रकाराची दाखल घेऊन राष्ट्रीय महामार्ग विभाग व संबंधित कंत्राटदारावर कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**रुपेश वाळके**
**अध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस मोर्शी तालुका.**

# एमपीएससी क्लार्क २०२३ च्या निकाल व नियुक्ती संदर्भात भाजपा नेत्या मा.खा. नवनित राणा यांच्या पाठपुराव्याला यश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) घेतलेल्या क्लार्क २०२३ परीक्षेच्या निकाल व नियुक्ती प्रक्रियेत होणाऱ्या विलंबामुळे हजारो उमेदवार मानसिक तणावात होते. या प्रकरणी भाजपा नेत्या व खासदार मा. नवनित राणा यांनी सक्रिय पुढाकार घेत पाठपुरावा केला आणि अखेर या पाठपुराव्याला यश लाभले.

एमपीएससी क्लार्कची पूर्व परीक्षा ३० एप्रिल २०२३ रोजी, मुख्य परीक्षा १७ डिसेंबर २०२३ रोजी आणि कौशल्य चाचणी ४ जुलै ते १३ जुलै २०२४ दरम्यान घेण्यात आली होती. मात्र, निकालाच्या विलंबामुळे उमेदवारांमध्ये प्रचंड नाराजी होती. या पार्श्वभूमीवर उमेदवारांनी थेट मा.खा. नवनित राणा यांच्याकडे मदतीसाठी धाव घेतली.राणा यांनी संबंधित शासन व प्रशासनाकडे तातडीने पाठपुरावा करत विद्यार्थ्यांच्या मागणीसाठी आवाज उठवला. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ११ फेब्रुवारी २०२५ रोजी निकाल जाहीर करण्यात आला. त्यानंतर १६ एप्रिल २०२५ रोजी तात्पुरती निवड यादी जाहीर झाली व ११ जुलै २०२५ रोजी अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली. सध्या निवड झालेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी प्रक्रिया सुरू आहे.या यशस्वी प्रक्रियेमुळे आणि न्याय मिळवून देणाऱ्या प्रयत्नांमुळे अनेक उमेदवारांनी अमरावती येथील गंगा सावित्री निवासस्थानी भेट देऊन नवनित राणा यांचे पुष्पगुच्छ देऊन आभार मानले. यावेळी उपस्थित उमेदवारांच्या चेहऱ्यावर समाधानाचे आणि आनंदाचे भाव स्पष्ट दिसत होते.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोर्शी शांतता समिती बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ मोर्शी**

दि २८ रोजी येणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोर्शी शांतता समिती बैठक संपन्न झाली. जी. पो. अधीक्षक विशाल आनंद, उप. वी. पो. अधी. खांडेकर व मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत या बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद हे वार्षिक तपासणी व शांतता समिती बैठक साठी मोर्शीला आलेले असताना ही सभा घेण्यात आली. नुकतेच श्रीगणेशाचे आगमन मोठ्या उत्साहात आनंदात व शांततेत पार पडले. संपूर्ण शहरात क्षुल्लक घटनाही कानावर आली नाही. या उत्सवां दरम्यान शांतता समिती पदाधिकारी यांनी सर्व गणेशमंडळ व युवकांना मार्गदर्शन करावे असे आव्हान मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांनी केले तर मोर्शी शहराच्या गणेशोत्सवाचा शांततेचा इतिहास पाहता यंदाचा हा गणेशोत्सव शांततेत व आनंदात उत्साहात पार पडेल व या सर्व उत्सवा दरम्यान शांतता समिती सदस्य पत्रकार शहरातील सर्व गणमान्य नागरिकांचे सहकार्य आमच्या विभागाला मिळेल ही खात्री ठेवून सर्व प्रसंग आनंदात साजरा करा सोबतच इतर धर्मियांच्या सणांमध्ये सुद्धा शांततेत सर्वांच्या सहकार्याने पार पाडावे ही अपेक्षा. प्रत्येकाला आपापल्या सर्व उत्सवांना साजरी करण्याचे स्वातंत्र्य आहे त्यासोबतच इतरही सण उत्सव हे शांततेत व आनंदात पार पडावे.

# अमरावतीत शैक्षणिक व आरोग्य सुविधांची पाहणी

## महापालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचा बेलपुरा परिसर दौरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज बेलपुरा परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या शैक्षणिक व आरोग्य सुविधांची पाहणी केली. या पाहणीत महापालिकेच्या प्राथमिक सेमी इंग्रजी शाळा क्र.७, हिंदी सेमी इंग्रजी शाळा क्र.३ आणि आरोग्य वर्धिनी केंद्र यांचा समावेश होता. लवकरच या सुविधा नागरिकांसाठी खुल्या केल्या जाणार आहेत.या दौऱ्यात आयुक्तांनी दरोगा प्लॉट, कहेकशा कॉलनी व काझीयान नगर येथे सुरू असलेल्या आरोग्य वर्धिनी केंद्रांच्या बांधकामांचीही तपासणी केली. संबंधित अधिकाऱ्यांना कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे



निर्देश देत, आयुक्त चांडक यांनी नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.नवीन शाळा व आरोग्य केंद्र लवकर सुरू करण्याच्या सूचना देताना आयुक्तांनी स्वच्छता, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधा तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले. सुरू असलेल्या प्रकल्पांची गुणवत्ता तपासून कोणतीही त्रुटी राहू नये, याचीही दक्षता घेण्यास सांगितले.

नागरिकांचा अभिप्राय महत्त्वाचासुविधा सुरू करताना स्थानिक नागरिकांचा अभिप्राय घेण्याचे आणि त्यांच्या गरजा लक्षात घेऊन सेवा राबवण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. सर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.या दौऱ्यात माजी स्थायी समिती सभापती राधा राजु कुरील, शहर अभियंता रविंद्र पवार, वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल काळे, स्वच्छता अधिकारी डॉ. अजय जाधव, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भूषण पुसतकर, उपअभियंता प्रमोद इंगोले, विवेक देशमुख, डॉ. संदीप पाटबागे, वरिष्ठ निरीक्षक विजय बुरे, अभियंता मंगेश कडु, आरोग्य निरीक्षक, कंत्राटदार आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.